






संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २५.०८.२०२६ | अंक नं. १२४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020


## रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा

### मानून जगणारे आदर्श डॉक्टर

# डॉ.श्री.एस.एस.दिपक

## आपणास वाढदिवसानिमित्त उदंड आयुष्य लाभो..



: शुभेच्छूक :

**अंबादास (लिंबाशेठ) नागरगोजे । बाबासाहेब (आप्पा) नागरगोजे**

(उद्योजक) (नगरसेवक, म.न.पा.अहिल्यानगर)

**गहिणीनाथशेठ नागरगोजे** (उद्योजक)

**अंबिका उद्योग समुह । शिव गौरांश पेट्रोलियम MIDC, अहिल्यानगर**

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# भिंगारमध्ये रात्रीच्यावेळी संशयास्पदरित्या वावरणाऱ्या दोघांना पोलिसांनी पकडले

नगर - भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने कोंबिंग ऑपरेशन आणि रात्र गस्तीदरम्यान कॅन्टोंमेंट लॉन परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी अंधारात संशयास्पदरित्या थांबलेल्या दोघांना ताब्यात घेतले आहे.त्यांच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ अन्वये दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिली कारवाई २३ ऑगस्ट रोजी रात्री १०.०५ वाजता कॅन्टोंमेंट लॉन परिसरातील एका झाडाच्या आडोशाला अंधारात उभे असलेल्या आकाश राजु पारचे (वय २६, रा. तपेश्वर मंदिरामागे, सौरभनगर, भिंगार) याच्यावर करण्यात आली. पोलीस पथकाला पाहताच पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या या तरुणाला पकडून विचारपूस केली असता त्याने कोणतेही समाधानकारक उत्तर दिले नाही. तो स्वतःचे अस्तित्व लपवून चोरीच्या उद्देशाने तिथे थांबल्याचे स्पष्ट झाल्याने पो. ना. प्रमोद मधुकर लहाहरे यांच्या फिर्यादीवरून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरी कारवाई रात्री १०.४० वाजता कॅन्टोंमेंट लॉन परिसरातच करण्यात आली, तेथे पोलीस पथकाला पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या शुभम प्रवीण माहुलकर (वय ३०, रा. कुंभार गल्ली, भिंगार) याला ताब्यात घेण्यात आले. त्याची चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याच्या विरुद्ध पो. ना. वैभव झिने यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलिसांची गुटख्याच्या तस्करी विरोधात मोठी कारवाई; सिनेस्टाईल पाठलाग करून ५१ लाखांचा मुद्देमाल जप्त



खर्डा पोलिसांनी पकडलेला गुटख्याचा साठा.

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील खर्डा पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांविरोधात एक मोठी कारवाई केली आहे. २४ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून तब्बल ५१ लाख ४१ हजार ४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

खर्डा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांना गुप्त बातमीदाराद्वारे बातमी मिळाली होती की, धाराशिवकडून बीडकडे जाणाऱ्या एका आयशर टेम्पोमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ शिर्डी-हैदराबाद राज्य महामार्गाने घेऊन जाण्यात येत आहेत. या माहितीच्या आधारे खर्डा पोलिसांनी जातेगाव फाटा येथे तातडीने नाकाबंदी लावली.

नाकाबंदी दरम्यान एक संशयित टेम्पो भरधाव वेगात येताना दिसला. पोलिसांनी त्याला थांबण्याचा इशारा केला असता, चालकाने वाहन न थांबवता सुसाट वेगात बीडच्या दिशेने पळवले. पोलिसांनी अजिबात वेळ न गमावता तत्परता दाखवून त्या टेम्पोचा सिनेस्टाईल पाठलाग केला आणि तेलंगशी गावच्या शिवारात त्याला ताब्यात घेतले.

टेम्पोची कसून पाहणी केली असता त्यात ४१ लाख ४१ हजार ४८ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधी सुपारी, तसेच १० लाख रुपये किमतीचा आयशर टेम्पो असा एकूण ५१ लाख ४१ हजार ४८ रुपयांचा मुद्देमाल मिळून आला, पोलिसांनी हा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी आरोपी राजू मेहबूब शेख (रा. भेंडटाकळी, ता. गेवराई, जि. बीड), प्रदीप विष्णु गायकवाड (रा. चरहाटा फाटा, ता. जि. बीड) आणि तुषार नामदेव कुसळकर (रा. बीड) या तिघांविरोधात पोलीस कॉन्स्टेबल शशिकांत म्हस्के यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) आणि अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ च्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत खर्डा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत, पोलीस उपनिरीक्षक अशोक खेडकर, पोलीस अंमलदार संभाजी शेंडे, गोकुळ इंगवले, रावसाहेब नागरगोजे, शशिकांत म्हस्के, वैजिनाथ मिसाळ, बाळू खाडे, आनंद धनवडे, विष्णू आवारे, अशोक बडे, राहुल खेडकर तसेच होमगार्ड तान्हाजी जायभाय, महादेव कदम आणि राहुल भिसे यांनी सहभाग घेतला.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अशोक खेडकर करत आहेत.

# एमआयडीसी परिसरात धारदार शस्त्रांसह दहशत माजवणारे चौघे जण जेरबंद

**कोयता, कत्ती, चाकू ही हत्यारे जप्त, आरोपींमध्ये २ अल्पवयीन मुलांचा समावेश**

नगर - अहिल्यानगर ते मनमाड जाणाऱ्या रस्त्यावरील हॉटेल साईदीपच्या पाठीमागे धारदार शस्त्रांसह दहशत निर्माण करणाऱ्या चौघांना एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईत पोलिसांनी कोयता, कत्ती, चाकू आणि दोन मोटारसायकल असा एकूण १ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल संपत नवनाथ खेडकर यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून संस्कार प्रकाश येवलेकर (वय २२, रा. गजानन कॉलनी, नवनागापूर), ईश्वर गणेश नवसुपे (वय २२, रा. गजानन कॉलनी, नवनागापूर) आणि त्यांच्यासोबत असलेल्या दोन अल्पवयीन मुलांवर शस्त्र अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास हे सर्व आरोपी मोटारसायकलवर विनापरवाना धारदार लोखंडी कोयता, कत्ती व चाकू सोबत बाळगून दहशत पसरवताना मिळून आले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपींकडून ११.५ इंच लांबीचा चाकू, १५.५ इंच लांबीचा कोयता, धारदार कत्ती आणि दोन दुचाकी जप्त केल्या आहेत.

सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल दिवटे यांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चौधरी करत आहेत.

# धावत्या कारला भीषण आग; आगीत वाहन जळून खाक

श्रीगोंदा - श्रीगोंदा-साळवणदेवी रोडवर २४ ऑगस्ट रोजी सकाळी धावत्या टाटा इंडिका कारने अचानक पेट घेतला. या आगीत कार पूर्णपणे जळून खाक झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. सुनील यादव गाडे हे टाटा इंडिका कार (क्र. एमएच १६ एजे ६३५४) मधून अधोरेवाडी येथून श्रीगोंद्याच्या दिशेने येत होते. सकाळी १० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या वाहनाने अचानक पेट घेतला. घटना लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी अग्निशमन दलाला माहिती देऊन आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आगीची तीव्रता प्रचंड असल्याने वाहनाला वाचविणे शक्य झाले नाही. काही वेळातच संपूर्ण कार आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

# मुकुंदनगरमध्ये गोमांस विक्री करणाऱ्या दोघांवर कारवाई

नगर - अहिल्यानगर शहरात भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुकुंदनगर भागात गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करून बेकायदेशीरपणे गोमांस विक्री करणाऱ्या दोन वेगवेगळ्या ठिकाणांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. २३ ऑगस्ट रोजी सकाळी भिंगार कॅम्प पोलिसांनी मुकुंदनगर भागातील बडी मरिद मस्जिद जवळ आणि इसरत पार्क परिसरातील पत्राच्या शेडमध्ये छापे टाकून ही कारवाई केली.

पहिल्या कारवाईत बडी मरिद मस्जिद जवळ अभिलाषा कॉलनी येथे मुनव्वर फकीर सय्यद (रा. झेंडीगेट, अहिल्यानगर) याच्याकडून सुमारे ५५ किलो गोमांस, लोखंडी वजन काटा व सत्तूर असा एकूण १७ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर दुसऱ्या कारवाईत इसरत पार्क येथे एका पत्र्याच्या शेडमध्ये इम्रान शब्बीर शेख (रा. झेंडीगेट, अहिल्यानगर) याच्याकडून सुमारे ४५ किलो गोमांस, वजन काटा व सत्तूर असा एकूण १४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

हे दोघेही आरोपी झेंडीगेट येथील आपल्या राहत्या घरी जनावरांची कत्तल करून मुकुंदनगर भागात गोमांस विक्रीसाठी आणत असल्याचे तपासात समोर आले असून, भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सर्जेपुरा परिसरात गोमांस विक्री करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

नगर - गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांसाची विक्री करणाऱ्या दोघांना तोफखाना पोलिसांनी पकडले. शहरातील कौलारू कॅम्प, सर्जेपुरा परिसरात २२ ऑगस्ट रोजी सकाळी ही कारवाई करण्यात आली. सुमारे ६० किलो गोमांस, लोखंडी वजनकाटा आणि चाकू-सत्तूर असा एकूण १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. कौलारू कॅम्प सर्जेपुरा परिसरातील एका घरात गोमांसाची विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता संशयित गोमांस विक्री करताना आढळून आले. या कारवाईत पोलिसांनी अंदाजे १२ हजार रुपये किंमतीचे ६० किलो गोमांस जप्त केले. या प्रकरणी मोहम्मद शारीक अब्दुल रशीद कुरेशी आणि इमरान हनीफ कुरेशी (दोघे रा. झेंडीगेट) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बेकरी व्यावसायिकासह भावाला मारहाण

नगर - जुना बाजार परिसरातील बॉम्बे बेकरी गोदामावरून झालेल्या वादातून बेकरी व्यावसायिक व त्यांच्या भावाला लाकडी काठीने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सावेडी येथील रहिवासी असलेले बेकरी व्यावसायिक मोहम्मद अब्दुलरहमान चाऊस (वय ३०) हे २३ ऑगस्ट रोजी सकाळी जुना बाजार रोडवरील आपल्या बॉम्बे बेकरी गोदामात गेले होते. त्यावेळी आरोपी आयान नाशिर बागवान, शकील बागवान, नाशिर बागवान, दोन महिला व इतर दोन अनोळखी इसम तेथे आले. त्यांनी 'गोदाम उघडायचे नाही आणि या रस्त्याने यायचे नाही' असे म्हणत दमदाटी सुरू केली. त्यावर फिर्यादीने हा रस्ता सामाईक असल्याचे सांगितले. फिर्यादी गोदामाचे शटर उघडून आत गेले असता, आरोपींनी पाठीमागून येऊन मोहम्मद चाऊस व त्यांच्या भावाला लाकडी काठ्या आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच गोदामाच्या खिडक्यांच्या काचा व बेकरीचे मशिन फोडून मोठे नुकसान केले. 'आमच्या नादाला लागाल तर खोटा गुन्हा दाखल करू' अशी धमकीही दिली. जखमींना उपचारासाठी तातडीने सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## श्रीमती शकुंतलाबाई दंडी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - पंचरंग गल्ली, नालेगाव येथील रहिवासी श्रीमती शकुंतलाबाई लक्ष्मण दंडी (वय ८३) यांचे २५ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे, १ मुलगी, जावई, नातू, पंतू असा परिवार आहे. व्यंकटेश व मिलींद दंडी यांच्या त्या मातोश्री होत.

## प्रकाश सावंत यांचे अल्प आजाराने निधन



नगर - शहरातील भवानीनगर भागातील प्रकाश गोविंदराव सावंत (वय ६७) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. भुसार मार्केट मधील मे. राजळे ॲण्ड सावंत कंपनीचे संचालक होते. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुन, दोन पुतणे, जावाई, नांतवडे असा परिवार आहे. ते भुषण सावंत यांचे वडील व प्रशांत सावंत यांचे चुलते होते.

## सुनील पांडे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील काळा राम मंदिरामागील वॉर्ड नं.७ येथील रहिवासी सुनील बाबुलाल पांडे (वय ६०) यांचे २४ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २५ ऑगस्ट रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ भाऊ, भावजया, २ मुले, पुतणे असा परिवार आहे.

## किशोर भांगरे यांचे निधन




अकोले - अकोले तालुक्यातील मनोहरपुर, सुगांव बु. गावचे रहिवासी किशोर पांडुरंग भांगरे यांचे दुखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी छाया, मुलगा तुषार, मुलगी निकिता, जावई, भाऊ, बहीण, भाचे, पुतणे, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मनोहरपुर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## सादेका अब्बास मिर्झा यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष, अमानत पतसंस्थेचे संचालक, हाजी साजिद अब्बास मिर्झा यांच्या मातोश्री, चांद सुलताना हायस्कूल अहमदनगरच्या सेवानिवृत्त शिक्षिका श्रीमती सादेका अब्बास मिर्झा (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील कब्रस्तानात त्यांचा दफनविधी झाला.

## सतिश राक्षे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीगोंदा - येथील रहिवासी सतिश दत्तात्रय राक्षे (वय ७८) यांचे २२ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. श्रीगोंदा येथील प्रसन्न हार्डवेअरचे मालक प्रसन्न राक्षे यांचे ते वडील होत.


विशाल म्हस्के यांना शिवप्रहार संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्तीचे पत्र देताना संजीव भोर. समवेत शंकर धोंडगे, एम. एम. तांबे, राजेंद्र कोंढरे, राज देशमुख, माणिक डावरे आदी.

# शिवप्रहार संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी विशाल म्हस्के

नगर - शिवप्रहार संघटनेच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यकर्ता व पदाधिकारी मेळाव्यात विशाल म्हस्के यांची शिवप्रहार संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष इंजिनिअर संजीव भोर यांच्या हस्ते म्हस्के यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

गोरगरीब, वंचित व उपेक्षित घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणाऱ्या तसेच उद्योग, सामाजिक व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून समाजावर सकारात्मक ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींचा यावेळी शिवप्रहारच्या वतीने पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

शिवप्रहार संघटनेच्या कार्यकर्ता मेळाव्यात राज्यातील विविध जिल्ह्यांमधील शंभरहून अधिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. यामध्ये विशाल म्हस्के यांच्या सामाजिक कार्याची, विविध संघटनांमध्ये केलेल्या कामाची तसेच दांडग्या जनसंपर्काची दखल घेऊन त्यांच्यावर अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली.

विशाल म्हस्के यांनी यापूर्वी मराठा क्रांती मोर्चा, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कामगार आघाडीसह विविध सामाजिक व संघटनात्मक पदांवर काम केले आहे. विविध सामाजिक प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेत जनसामान्यांशी सातत्याने संपर्क ठेवणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे.

या नियुक्तीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यात शिवप्रहार संघटनेचे संघटनात्मक काम अधिक गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, गोरगरीब वंचित घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत संघटनेचा विस्तार करण्याचा मानस म्हस्के यांनी व्यक्त केला. यावेळी शंकर धोंडगे, एम. एम. तांबे, मराठा महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोंढरे, राज देशमुख, माणिक डावरे, अमोल पाटील, सुरेश झोंबाडे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धतीमुळे आडसूळ पॉलिटेक्निकचे प्रवेश शंभर टक्के पूर्ण

नगर - चास येथील सौ. सुंदराबाई माणिक आडसूळ पॉलिटेक्निकच्या प्रथम व थेट द्वितीय वर्ष डिप्लोमा प्रवेशाकरिता अल्पशा रिक्त राहिलेल्या जागाही स्पॉट फेरीमध्ये शंभर टक्के पूर्ण भरल्याचे प्राचार्य डॉ. आर. एस. गडाख यांनी सांगितले. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ डिप्लोमा प्रवेशाकरिता आडसूळ पॉलीटेक्निकला विद्यार्थ्यांनी प्रथम पसंतीक्रम दिल्याने पॉलिटेक्निकच्या सिव्हिल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग व मेकॅनिकल इंजिनिअरिंग या पाचही शाखांचा शंभर टक्के प्रवेश पुर्ण करण्यात महाविद्यालयाला यश मिळाले आहे.

महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर हा सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याच्या कक्षेत येत असून महिला बाउन्सर्सच्या माध्यमातून कडक सुरक्षा योजना राबवली जात आहे. विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र तक्रार निवारण कक्षाची निर्मिती करण्यात आलेली आहे, विद्यार्थिनींच्या तक्रारी व सुरक्षेसाठी संस्थेच्या सेक्रेटरी सौ. लीना आडसूळ स्वतः वैयक्तिकपणे लक्ष घालत असून मुलींमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. अनिरुद्ध आडसूळ यांनी आपलं मनोगत व्यक्त करताना सांगितले की संस्थेच्या विविध शाखांमध्ये विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या दिवसेंदिवस वाढत होती परंतु आज पॉलिटेक्निकच्या सर्व शाखांच्या प्रवेशासाठीच्या जागा शंभर टक्के भरल्या असून याचे सर्व श्रेय पॉलिटेक्निकचे कर्तव्यदक्ष प्राचार्य डॉ. आर. एस. गडाख यांचे असून प्राचार्य पदाची सूत्रे हातात घेतल्यापासून पॉलिटेक्निकच्या नव्या अध्यायाला सुरुवात झाली. पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियेपासून गुणवत्तावर्धक शिक्षण, कौशल्य विकास, उद्योजकता विकास, विविध शैक्षणिक उपक्रम उत्कृष्ट निकालाची परंपरा हे त्यांच्या कामकाजाचे पैलू असून त्यांच्या कामकाजाची दखल घेत महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने आडसूळ पॉलीटेक्निकला अतिउत्तम श्रेणी प्रदान केल्याचे अध्यक्षांनी सांगितले व प्राचार्य डॉ. आर. एस. गडाख व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी संस्थेच्या सचिव सौ. लीना आडसूळ, संचालक कृष्णा आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, सदस्या डॉ. कल्पना आडसूळ, सौ. रत्ना आडसूळ, सौ. पायल आडसूळ, आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप एम. पाटील, प्राचार्य डॉ. संभाजी पठारे, सर्व विभाग प्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.


महाकाल ग्रुपच्या वतीने श्रावण सोमवारनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# महाकाल ग्रुपच्या वतीने श्रावण सोमवारी महाप्रसादाचे वाटप

नगर - नगर शहरात दरवर्षी महाकाल ग्रुपच्या वतीने हिंदूंचा पवित्र श्रावण महिन्यातील सोमवारी महाकाल ग्रुपच्या वतीने भंडाऱ्याचे (महाप्रसाद)व भगवान महाकाल सवारीचे पारंपारिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली. दिल्ली गेट येथील शनि मारुती मंदिरापासून महाकाल ची मिरवणूक चौपाटी कारंजा, चितळे रोड मार्गे महाकाल मार्ग येथे समोरोप करण्यात आला.

शहरातील भाविकांनी ठीक ठिकाणी महाकाल सवारीचे दर्शन घेतले. या मिरवणुकीत अहिल्यानगर शहरातील महाकाल भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर मान्यवरांच्या हस्ते महाकाल महादेवाची महाआरती करण्यात आली.

यावेळी महाकाल ग्रुपचे सुमित धेंड, रवी दंडी, संतोष गेनाप्पा, विक्रम राठोड, संभाजी कदम, पैलवान मनोज लोंढे, कुमार सुसरे, विकास वाघ, राजू इगे, रोहिदास बुरम, शंकर जिंदम, अक्षय वल्लाकट्टी, विशाल ठाकूर, सुनील जाधव, स्वप्निल खोडदे, वेदांत येमुल, यश सब्बन, रोहित गुगळे, सचिन शिरसाट, यश आडेप, प्रणव गुंटूक, अभिजीत येनगंदुल, श्रीनिवास श्रीगादी आदींसह महाकाल भक्त उपस्थित होते.

# छावनी परिषद शाळेतील विद्यार्थिनींच्या हस्ते सीमेवरील जवानांसाठी राख्या रवाना


पोस्टमास्टर संतोष यादव, पोष्टमन महेश घोलप, दिपक देवकर यांच्याकडे जवानांकरिता बनवलेल्या राख्या सुपूर्द करताना शाळेतील विद्यार्थिनी. समवेत संजय शिंदे, संजय हजारे, स्नेहल लवांडे, लता पाटील आदी.

नगर - देशाच्या सीमेवर आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या वीर जवानांप्रती प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भिंगार छावणी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेतील विद्यार्थिनींनी एक राखी जवानासाठी हा उपक्रम राबविला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींनी तयार केलेल्या राख्या सीमेवरील जवानांना पाठविण्यात आल्या.

या राख्या भिंगार कॅम्पचे पोस्टमास्टर संतोष यादव, पोष्टमन महेश घोलप, दिपक देवकर यांच्याकडे विद्यार्थिनींच्या हस्ते सुपूर्द करण्यात आल्या. देशाच्या सीमेवर खडतर परिस्थितीत सेवा बजावणाऱ्या जवानांपर्यंत शाळेतील विद्यार्थिनींच्या या प्रेमाच्या आणि कृतज्ञतेच्या भावना पोहोचविण्याचा हा छोटासा प्रयत्न शाळेकडून करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थिनींमध्ये देशभक्ती, राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि जवानांप्रती कृतज्ञतेची भावना रुजविण्यात आली. हा उपक्रम मुख्याध्यापक संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहल लवांडे, लता पाटील व सायली लेंडे, संजय हजारे यांनी राबवला. यावेळी सिमा चोभे, सुभाष भारूड, शरद पुंड, अंकुश शेळके, जी. आय. शेख, मनिषा साठे, आश्विनी यादव, पल्लवी काळे आदी उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### पुरेशा झोपेचे महत्त्व...

आपल्या शरीराला आणि मनाला दिवसभराच्या थकव्यातून सावरण्यासाठी आणि पुन्हा ताजेतवाने होण्यासाठी पुरेशी आणि गाढ झोप अत्यंत आवश्यक असते. ज्याप्रमाणे यंत्रांना चालण्यासाठी विश्रांतीची गरज असते, त्याचप्रमाणे आपल्या शरीरालाही आरामाची गरज असते. जेव्हा आपण गाढ झोपेत असतो, तेव्हा आपले शरीर सुस्त नसते; तर ते अंतर्गत दुरुस्तीचे आणि पुनरुत्पादनाचे महत्त्वाचे काम करत असते. दिवसभरात शरीराच्या पेशींची जी झीज झालेली असते, ती भरून काढण्याचे काम झोपेच्या काळात होते. स्नायूंची वाढ होणे, शरीरातील ताणलेल्या ऊती बऱ्या होणे आणि शरीराची प्रतिकारशक्ती मजबूत होणे ही सर्व प्रक्रिया झोपेदरम्यानच वेगाने पार पडतात. पुरेशा झोपेमुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते आणि हृदयाचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्यासाठीही झोपेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. दिवसभरात घडलेल्या गोष्टींवर विचार करून मेंदू रात्रीच्या वेळी माहितीची वर्गवारी रतो आणि स्मृती पक्की करण्याचे काम करतो. पुऱ्या झोपेमुळे स्मरणशक्ती कमी होणे, चिडचिड ाढणे, एकाग्रता ढासळणे आणि नैराश्य चिंता यांसारख्या मानसिक समस्या ळावू शकतात. शांत झोप मिळाल्यामुळे मेंदूला विश्रांती मिळते आणि दुसऱ्या दिवशी ताजेतवाने व सकारात्मक वाटते. जर नियमितपणे पुरेशी झोप मिळाली नाही, तर वजन वाढणे, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि उच्च रक्तदाब यांसारखे गंभीर आजार जडण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते. म्हणूनच, रात्रीची सात ते आठ तासांची गाढ झोप ही कोणत्याही औषधापेक्षा जास्त महत्त्वाची आहे. निरोगी आयुष्य जगायचे असेल, तर वेळेवर झोपणे आणि वेळेवर उठणे ही सवय आपल्या जीवनशैलीत नक्कीच अंगीकारली पाहिजे.

## पाककला

### मँगो मलाई रोल

**साहित्य :** पांढरे ब्रेड स्लाईस ६, पिकलेले आंबे २ मोठे, मलाई १/२ वाटी, ताजी साय १/२ वाटी, साखर २ चमचे, वेलची पावडर १/२ चमचा, केशराचे धागे ८ ते १०, दूध २ चमचे कोमट, कापलेले पिस्ते १ चमचा, कापलेल्या बदाम १ चमचा, तूप १ चमचा

**कृती :** आंबे सोलून त्याचा गुळगुळीत गर काढून घ्या. त्यात साखर आणि अर्धी वेलची पावडर मिसळून फ्रीजमध्ये थंड करायला ठेवा. केशर कोमट दुधात १० मिनिटे भिजत ठेवा. एका वाटीत मलाई, साय, उरलेली वेलची पावडर आणि १ चमचा साखर घालून छान फेटून घ्या. त्यात केशराचे दूध घालून मिश्रण एकजीव करा. ब्रेडच्या कडा कापून टाका. पोळपाटावर ब्रेड ठेवून लाटण्याने पातळ लाटून घ्या. प्रत्येक ब्रेडवर मलाईचे मिश्रण पातळ थर लावा. त्यावर १ चमचा आंब्याचा गर पसरवा. त्यावर थोडे पिस्ते आणि बदामाचे काप पेरा. ब्रेड हलक्या हाताने घट्ट रोल करा. वरून थोडे तूप लावा. तयार मँगो मलाई रोल ३० मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा म्हणजे व्यवस्थित सेट होतील. वरून आंब्याचे काप, पिस्ता आणि केशराने सजवून थंड सर्व्ह करा.

## वास्तू

### तर असेल वास्तूदोष...

✽ मुख्य ददरवाजा उघडताना जर कर्कश आवाज होत असेल, तर तो वास्तूदोष मानला जातो. अशा आवाजामुळे घरातील वातावरण विचलित होते आणि नकळतपणे घरातील सदस्यांमध्ये मानसिक ताण, नैराश्य वाढू शकते.

✽ कर्कश आवाज करणारा दरवाजा घरात येणाऱ्या आर्थिक समृद्धीमध्ये अडथळे आणतो आणि कुटुंबात सतत मतभेद किंवा कलह निर्माण करू शकतो.

## सौंदर्य

मुलतानी माती आणि चंदनामध्ये गुलाबजल मिसळून पेस्ट तयार करा. चेहऱ्यावर लावून पूर्ण सुकल्यावर साध्या पाण्याने धुवा. यामुळे चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल आणि पिंपल्स कमी होण्यास मदत होते.

## सल्ला

हिरव्या भाज्या (उदा. पालक, मटार) उकडताना किंवा शिजवताना त्यात चिमूटभर साखर घातल्यास त्यांचा हिरवा रंग कायम राहतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६

**ऋक् श्रावणी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, श्रवण २४।४८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कार्यात यश लाभेल, नव्या संधी मिळतील.

**वृषभ :** व्यवसायात संयम ठेवा. अवाजवी खर्च टाळा.

**मिथुन :** रखडलेली कामे वेगाने पूर्ण होतील. मित्रांकडून सहकार्य लाभेल.

**कर्क :** सेवेत वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. निर्णय घेताना घाई टाळा.

**सिंह :** आत्मविश्वासात वाढ होईल. धार्मिक कार्यात आवड वाढेल.

**कन्या :** विरोधकांपासून सावध राहा. प्रकृतीच्या तक्रारी जाणवतील.

**तूळ :** भागीदारीच्या व्यवसायात फायदा होईल.

**वृश्चिक :** जुने विकार बळावण्याची शक्यता आहे.


**धनु :** अपेक्षेप्रमाणे कार्यात यश मिळेल. प्रवासाचे योग आहेत.

**मकर :** मालमत्तेशी संबंधित बाबी मार्गी लागतील. सेवेत चांगल्या संधी मिळतील.

**कुंभ :** भावंडांचे सहकार्य लाभेल. नवे जनसंपर्क वाढतील.

**मीन :** आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

## शब्दगंध क्र. ७५०२ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७५०१ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) एक मराठी आडनाव; मांडलिक राजा ४) किरकिर; डोकेदुखी; त्रास ७) भरपूर; खूप; पुष्कळ ८) ओढा वगैरेंवर बांधलेला तात्पुरता पूल ९) हरभरा, तूर वगैरे धान्याचे दोन भाग ११) बैलाच्या खांद्यावरील जोखड १२) अजिबात सरळ नसलेला; एकदम वक्र १६) बोंब; गोंधळ १७) चहा पिण्याचे एक भांडे; बशीचा जोडीदार १९) कपड्यावर वगैरे केलेले नक्षीकाम; वेलबुट्टी २०) झुडपांवर वगैरे सरपटणारा एक क्षुद्र जीव २१) अटीची भाषा २४) मजल; रेंज २५) गोणपाटाचा तुकडा; ताटूक

**उभे शब्द :-** १) एक राजस्थानी आडनाव जे उद्योग, व्यवसायात प्रसिद्ध आहे २) आठवड्यातील एक दिवस ३) निकाल; परिणाम; शेवट; फैसला ४) कोणत्या प्रकारचा; अरुंद तोंडाची लांबट पिशवी ५) रायगडावरील एक बुरूज ६) मिठी; आलिंगन १०) अनेक कुटुंबे राहत असलेले मोठे घर १३) टाळ्यांचा आवाज १४) बाण मारण्यात निष्णात; धनुर्धारी १५) पोस्ट; टपाल; मेल १६) थोडेसे ओले; आंबटओले १८) पसरलेले; विस्तृत २२) मग्न; रममाण; लीन; लिप्त; गुंग २३) त्याअर्थी

# ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽ मुलांचे विश्व ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽

**सुविचार :** शिकवण देणारी सर्वात मोठी शाळा म्हणजे आपली 'कठीण परिस्थिती' होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आपल्याला झोपेतून उठल्यावर कधीकधी स्वप्ने आठवतात, पण काही वेळा ती पूर्णपणे का विसरली जातात?

आपण जेव्हा रात्री गाढ झोपेत असतो, तेव्हा आपली स्वप्नांची एक वेगळीच सफारी सुरू असते. कधी आपण ढगांवर उडत असतो, तर कधी जुन्या ओळखीच्या लोकांसोबत रम्य प्रवासात असतो. पण गंमत म्हणजे, सकाळी जाग आल्यावर काही स्वप्ने अगदी स्पष्ट डोळ्यांसमोर येतात, तर काही स्वप्ने आपण हवेत विरघळून गेल्यासारखी पूर्णपणे विसरून जातो. असे नेमके का घडते? यामागे आपल्या मेंदूची एक अद्भुत रचना आणि विज्ञानाचे काही नियम दडलेले आहेत.

आपली झोप ही प्रामुख्याने दोन भागांत विभागलेली असते – एक सर्वसाधारण झोप आणि दुसरी स्वप्नांची झोप, ज्याला जलद डोळ्यांची हालचाल असे म्हणतात. जेव्हा आपण या स्वप्नांच्या अवस्थेत असतो, तेव्हा आपला मेंदू दिवसभर घडलेल्या गोष्टींची छाननी करत असतो. दिवसा जमा झालेली माहिती मेंदूतील वेगवेगळ्या खोंग्यांमध्ये साठवली जाते.

मात्र, स्वप्ने लक्षात राहणे किंवा विसरणे हे मुख्यत्वे आपल्या मेंदूच्या एका विशिष्ट भागावर अवलंबून असते, ज्याला स्मृती केंद्र म्हणतात. हा भाग आपल्या अल्पकालीन आठवणींचे दीर्घकालीन आठवणींमध्ये रूपांतर करण्याचे महत्त्वाचे काम करतो. जेव्हा आपण गाढ स्वप्नांच्या अवस्थेत असतो, तेव्हा मेंदूतील हा भाग आणि इतर आठवणींची केंद्रे थोडीशी विश्रांतीच्या स्थितीत असतात. यामुळे स्वप्नांमधील अनुभव पक्के नोंदवले जात नाहीत.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे झोपेतून उठण्याची वेळ. जर एखादी व्यक्ती नेमकी स्वप्न पाहण्याच्या अवस्थेतूनच पटकन जागी झाली, तर ते स्वप्न ताजे असते आणि आठवते. याउलट, जर झोप पूर्ण झाल्यावर किंवा मधल्या शांत झोपेच्या टप्प्यातून जाग आली, तर मेंदूने तोपर्यंत नवीन विचार प्रक्रियेला सुरुवात केलेली असते.

परिणामी, मघाशी पाहिलेले स्वप्न मेंदूच्या पटलावरून हळूहळू पुसट होत जाते आणि आपण ते पूर्णपणे विसरतो.

याशिवाय, शरीराच्या अंतरंगात डोकावून सांगायचे तर, झोपेत असताना आपल्या शरीरात काही विशेष रासायनिक घटक तयार होतात, ज्यांमुळे नवीन आठवणी टिकवून ठेवणे कठीण होते. म्हणूनच, स्वप्ने ही वाळूवर काढलेल्या रेषांसारखी असतात, जी सकाळचा सूर्य उगवताच किंवा नवीन विचार सुरू होताच पुसून जातात. स्वप्नांचे हे विश्व जितके रहस्यमय आहे, तितकेच आपल्या मेंदूचे कार्य अचूक आणि थक्क करणारे आहे.

### उपकारांचे स्मरण

एका घनदाट जंगलात एक हत्ती राहायचा. तो खूप दयाळू होता. एकदा तो जंगलातून चालला असताना त्याला एका छोट्या चिमणीचा चिवचिवाट ऐकू आला. जवळ जाऊन पाहिले तर चिमणीचे घरटे एका वाळलेल्या फांदीवरून खाली पडले होते आणि त्यातील तिची पिल्ले घाबरून ओरडत होती. हत्तीला त्यांची दया आली. त्याने अत्यंत काळजीपूर्वक आपली सोंड वाढवली आणि ते घरटे उचलून पुन्हा झाडाच्या सुरक्षित फांदीवर ठेवून दिले. चिमणीने कृतज्ञतेने हत्तीचे आभार मानले आणि ती आनंदाने आपल्या पिल्लांसोबत राहू लागली.

काही दिवसांनंतर, जंगलात एक शिकारी आला. त्याने हत्तीला पकडण्यासाठी एक मोठा जाड जाळाचा सापळा रचला होता. हत्ती शिकारीची चाहूल न लागल्यामुळे सरळ त्या सापळ्याकडे गेला. अचानक हत्ती त्या जाळ्यात अडकला. तो सुटण्याचा खूप प्रयत्न करू लागला, पण जाळे खूप मजबूत होते. हत्ती मोठ्याने मदतीसाठी ओरडू लागला.

ती चिमणी जवळच्याच झाडावर होती. तिने हत्तीचा आवाज ऐकला आणि ती लगेच तिथे धावत आली. हत्तीला जाळ्यात अडकलेले पाहून तिने विचार केला, या हत्तीने एकदा माझ्या पिल्लांचे प्राण वाचवले होते, आता माझी वेळ आहे त्याची परतफेड करण्याची!

चिमणीने आपल्या इतर चिमणी मित्रांना बोलावले. सर्व चिमण्यांनी मिळून आपल्या टोकदार चोचीने ते जबूत जाळे टप्प्याटप्प्याने कुरतडून टाकले. काही वेळातच जाळे तुटले आणि हत्ती त्यातून मुक्त झाला. हत्तीची सुटका झाल्यामुळे त्याने आनंदाने चिमणीचे आभार मानले. दोघांची मैत्री अधिक घट्ट झाली.

तात्पर्य : केलेल्या उपकाराची जाणीव ठेवणे म्हणजेच कृतज्ञता होय. कठीण प्रसंगी केलेली मदत कधीही वाया जात नाही आणि कृतज्ञतेचे फळ नेहमी चांगलेच मिळते.

# आत्मशक्ति



### एक आवाज स्वर्गीचा

पावत नाही. आत्म्यापासून दिव्य प्रेम धारा वाहात बाहेर पडते आणि मग त्या अनामी शक्तिमध्ये म्हणजे मुलस्थानी परमेश्वराकडे घेऊन जाते. दिव्य संगीतात तल्लीनताकाही महापुरुष सांगतात की, आत्म्याचे हे संगीत आमच्या अंतरी रात्रंदिवस गुंजायमान आहे, ते आम्हाला ऐकू येत असून आम्ही ह्या मधुर गायनाने धुंद झालो आहोत. ह्या संगीताचा आस्वाद आत्मा सदैव घेतो आणि धुंद होतो.

हे संगीत आनंद जगातल्या संगीतासारखे नाही. वाद्याने ते निर्माण होत नाही वा कोणा माणसाकडून गायिले जात नाही. अंतरीचे हे मधुर संगीत आत्म्याला भेदून जाते. हे संगीत परमेश्वरापासून निर्माण होते. प्रत्येक आत्म्यात ते गुंजायमान असते. हे संगीत देहभान हरपवणे आणि अत्यानंद देणारे आहे.

एखाद्या जलपरीच्या मधुर गाण्यासारखे हे संगीत आमच्या आत्म्याला आपल्या तालासुराने मोहित करते वेगवेगळ्या धर्मग्रंथात आत्म्याच्या अमर संगीताबद्दल उल्लेख आलेला आहे. मौलाना रुमी साहेब म्हणतात

हे बहादुर आत्मा, तू मन के स्तर से ऊपर उठ,
और ऊपर से आती संगीत की पुकार को सुन ।।

हाफिज म्हणतात – आकाशातून एक आवाज एकसारखा खाली येत आहे. परंतु खेदाची गोष्ट आहे की तुम्ही निरर्थक कामात अडकले आहात.

(तो आवाज ऐकत नाहीत).

संत दादू साहेबांनी म्हटले आहे –

अनहद नाद गगन गढ गरजा ।।
तब रस खाया अमीदा ।।

शिखांचे पाचवे गुरु, गुरु अर्जुनदेवजी महाराज म्हणतात –

अनिक अनाहद आनंद झुनकार ।
उआ रस का कछु अंतु न पार ।।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### त्यांचा विवेक

शिवानीदीदी : मदतीसाठी नोकरांची गरज असू शकते. पण बाळाला भरवताना किंवा त्याला झोपवताना चांगल्या स्पंदनांची गरज असते. बाळाला सर्वात जास्त गरज याचीच असते. आईवडील किंवा आजीआजोबा यांची स्पंदनं आणि मदतनिसांचे तरंग यांची तुलना होऊ शकत नाही. मदतनीस पैसे मिळवण्यासाठी किंवा तिच्या मालकाला प्रसन्न करण्यासाठी ते करते. बाळाला त्याच्या कुटुंबाकडून जे प्रेम, शक्ती, विवेक आणि स्पंदनं मिळतात ती त्याला इतर कोणीही देऊ शकत नाही. आजीआजोबांची मात्र उपस्थितीही बाळाचं संगोपन चांगल्या स्पंदनांनी करते. बालपणात जर बाळ एकत्र कुटुंबात वाढत असेल तर ते खूप नशीबवान असतं. कारण ते कुटुंबातील अनेक सदस्यांची स्पंदनं ग्रहण करतं. पण जेव्हा एखादं बाळ मदतनिसाच्या हाताखाली किंवा पाळणाघरात वाढतं तेव्हा त्याला कुटुंबातील सदस्यांची स्पंदनं मिळत नाहीत.

सुरेश ओबेरॉय : पालक बाहेर गेले की मदतनीस मुलांना टी.व्ही.वर कार्टून लावून देते.

शिवानीदीदी : अशा सगळ्या छोट्या छोट्या पण महत्त्वाच्या घटकांमुळेच आजकालची मुलं मनाने कमकुवत होत आहेत. जेव्हा आपण लहान होतो तेव्हा आपल्या घरातील वातावरण आजच्या वातावरणापेक्षा वेगळं होतं. बाह्यतः परिपूर्ण असणं चांगलं आहे पण, त्या मार्गावर आपण जेवढे पुढे जाऊ तेवढे आपण आपल्या आतील परिपूर्णतेपासून लांब होत जाऊ, म्हणजेच आपण आपल्या सहज ज्ञानापासून दूर जाऊन केवळ तर्कावर आधारित ज्ञानावर अवलंबून राहू. आपण आपल्या विवेकापासून लांब जाऊन केवळ शास्त्रीय आधारांवर विसंबून राहू. पूर्वी आपण सगळं लक्षात ठेवायचो पण आता आपण आपल्याकडील यंत्रांवर (गॅजेट्स) अवलंबून आहोत. आपल्या उपजत गुणांपासून आपण स्वतःला दूर करत आहोत. मग आपण आपल्या मुलांना काय देणार? आपण त्यांना भौतिक सुखसुविधा देण्याच्या गोष्टींवर अवलंबून राहायला सांगत आहोत. जर आपल्याला त्यांना काही द्यायचं असेल तर सर्वात प्रथम शुद्ध स्पंदनं द्यायला हवीत. बाळाचं संपूर्ण कुटुंबाबरोबर कार्मिक खातं असतं. जर आईचं तिच्या सासूबरोबरचं नातं चांगलं नसेल तर त्याचा थेट परिणाम बाळावर होईल. त्या दोघीमधील तणावपूर्ण नात्यामुळे आईला बाळाने आजीकडे जावं असं वाटणार नाही. बाळाच्या आयुष्यातील या दोन महत्त्वाच्या आत्म्यांबरोबर बाळाचं एक सुंदर कार्मिक खातं आहे पण जेव्हा आपल्यामुळे त्या दोघींमध्ये तणाव आहे याची जाणीव बाळाला होईल तेव्हा त्याला चांगली स्पंदनं मिळणार नाहीत.

सुरेश ओबेरॉय : त्याला अपराधी वाटेल.

शिवानीदीदी : बाळ काही महिन्यांचं असेल तरीही त्याला ते जाणवेल.

सुरेश ओबेरॉय : बाळाला आईच्या उदरात असतानाही गोष्टी जाणवतात. महाभारतात, अभिमन्युला चक्रव्यूहाचा भेद कसा करायचा ते अवगत होतं. (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गुरुजी : माणसाने नेहमी सत्य बोलावे
विद्यार्थी : गुरुजी, मग लग्नानंतर?
गुरुजी : तेवढं ज्ञान अनुभवातून घे!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✽ जगातील सर्वात मोठी पर्वतश्रेणी कोणती आहे?
– अँडीज पर्वतश्रेणी (दक्षिण अमेरिका)

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### नाचणी

४) मधुमेही रुग्णांमध्ये अनेक वेळा 'ब' जीवनसत्त्वाची कमतरता निर्माण होते. ती भरून काढण्यासाठी नाचणीचा आहारामध्ये उपयोग करावा. ५) मूळव्याधीतून रक्त पडत असेल, तर ते थांबविण्यासाठी व रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी नाचणीची पेज करून त्यामध्ये गायीचे तूप टाकून ती प्यावी. नाचणीच्या स्तंभक गुणधर्मामुळे मूळव्याधीतून रक्त पडण्याचे लगेचच थांबते. ६) लठ्ठपणा असणाऱ्या व्यक्तींनी स्थूलता कमी करण्यासाठी नाचणीच्या भाकरीचा आहारात उपयोग करावा. नाचणी खाल्ल्यामुळे तिचे सावकाश पचन होते. परिणामी भूक लवकर लागत नाही. तसेच तिच्यामध्ये प्रथिने, खनिजे, जीवनसत्त्वे विपुल प्रमाणात असून, उष्णता खूप कमी प्रमाणात असतात. त्यामुळे शरीरास आवश्यक ते पोषक घटक मिळून वजन कमी व्हायला मदत होते. ७) अंगावर बेंड आले असेल, तर ते पिकण्यासाठी नाचणीच्या पिठाचे पोटीस बांधावे. यामुळे बेंड लवकर पिकून ते फुटते. ८) रक्ताची कमतरता असणाऱ्या अशक्त रुग्णांनी, तसेच अपंग असणाऱ्या व्यक्तींनी नाचणीसत्त्व दुधात उकळून प्यावे. यामुळे शरीरास शक्ती मिळून उत्साह निर्माण होतो. ९) नाचणीच्या पानांचा रस त्वचेवर लावल्यास त्वचेवरील जखमा, व्रण, फोड, खरूज, त्वचाविकार बरे होतात.

१०) वृद्ध व्यक्तींची हाडे कमजोर झाली असतील किंवा एखादे हाड मोडले असेल, तर ते भरून येण्यासाठी नाचणीसत्त्व दुधात उकळून सकाळ–संध्याकाळ दोन वेळा प्यावे. सावधनता : सहसा नाचणीची भाकरी गायीचे साजूक तूप लावून खावी. नाचणीसत्त्व तयार करताना तिला प्रथमतः मोड आणून ती वाळवून दळून आणून त्यामध्ये दूध व साखर टाकावी. यामुळे नाचणीचे गुणधर्म दुप्पट प्रमाणात वाढतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००



बालरंगभूमीच्या राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावणारे छावणी परिषद शाळेचे विद्यार्थी.

# बालरंगभूमीच्या राज्यस्तरीय स्पर्धेत छावणी परिषद शाळेचा तृतीय क्रमांक

नगर – बालरंगभूमी परिषदेच्या वतीने आयोजित 'इतिहास महाराष्ट्राचा' राज्यस्तरीय महोत्सवाच्या महाअंतिम फेरीत छावणी परिषद शाळेने समूह सादरीकरणात उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. रविवारी अहिल्यानगर येथे या महोत्सवाची महाअंतिम फेरी उत्साहात पार पडली.बालरंगभूमी परिषदेच्या मध्यवर्तीच्या अध्यक्षा ॲड. नीलम शिर्के सामंत व उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या हस्ते रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली.

यंदाचा 'इतिहास महाराष्ट्राचा' महोत्सव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना समर्पित करण्यात आला होता. राज्यभरातून सुमारे ४५० बालकलावंतांनी या महोत्सवात सहभाग घेतला. नाट्य, नृत्य, गायन आणि वादनाच्या माध्यमातून बालकलावंतांनी अहिल्यादेवींचे प्रेरणादायी जीवनकार्य उलगडून दाखवत त्यांच्या विचारांचा जागर केला.

छावणी परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी समूह सादरीकरणातून अहिल्यादेवींच्या जीवनकार्याचे प्रभावी दर्शन घडविले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उत्कृष्ट अभिनय, सादरीकरणातील समन्वय आणि प्रभावी मांडणीच्या जोरावर शाळेने राज्यस्तरावर तृतीय क्रमांक मिळविला.

या विद्यार्थ्यांना स्नेहल लवांडे, मनिषा साठे, संजकुमार हजारें, रुपेश पसपुल आणि प्रेरणा वारभोग यांनी मार्गदर्शन केले. तसेच वाद्यवृंदाची साथसंगत हार्मोनियमवर आदिनाथ वाघमारे आणि ढोलकवर हर्षद गायकवाड ओंकार वाघमारे यांनी केली.

या महाअंतिम फेरीस ज्येष्ठ नाट्यकर्मी डॉ. विजय जोशी, बालरंगभूमी परिषदेचे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके, अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद भणगे आणि प्रमुख कार्यवाह शैलेश देशमुख यांची उपस्थिती होती.

छावणी परिषद शाळेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अहिल्यानगर छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम. प्रिया पुरोहित, कार्यालय अधीक्षक श्री. सुनील शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक श्री संजय शिंदे, सौ मुबीना सय्यद, श्री राजू भोसले तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले.

विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## सज्जनांच्या संगतीतच खरी गोडी

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन: दिशान फिचर्स




चांगल्या संगतीत राहावे, चांगल्या जागी वास करावा, मित्र आणि वास्तव्य पारखून घ्यावे. सगुणीच्या सोबतीमुळे आपल्यालाही मान मिळतो. केवळ श्रीमंताची संगत फळत नाही.

सोन्या म्हणविणारे पर्वत किंवा चांदीच्या नावाने ओळखले जाणारे पहाड काय कामाचे तेथील झाडे नुसतीच झाडे म्हणून केवळ इंधनाच्या कामी येतात. पण म लयगिरीवर चंदनाचे वन चंदनतरुच्या संगतीत राहणाऱ्या कडुनिंबासारख्या झाडांनाही चंदनाचा मान व भाव मिळतो. सद्गुणाच ज्यांच्या ठायी वास, त्यांचा नुसता वास जरी आपल्याला लागला तरी आपला खूप फायदा होतो.

सोन्या चांदीच्या नावाने केवळ बढाई मारणाऱ्या पर्वतांवरची झाडे नुसते जाळांचेच भक्ष्य असले बढाईखोर केवळ इतरांच्या टवाळीचेचे विषय पाहा ही गंमत.

एक पत्नी म्हणाली, गडे माझा नवरा केवढा चतूर तो जे लिहितो, ते त्याच्याशिवाय इतरांना वाचताच येत नाही. दुसरी पत्नी ते ऐकताच म्हणाली, यात कसली चतुराई ? माझा नवरा तर जे स्वतः लिहितो, ते इतरांना तर सोड, पण त्याला स्वतःलाही वाचता येत नाही.

म्हणून संग चांगला हवा. ज्ञानेश्वर माउली म्हणते.

ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी।
हरि दिसे जनी वनी आत्मतत्वी ।

सज्ञनांच्या संगतीतच खरी गोडी आहे. हरी आनंद स्वरुप आहे. मी आनंदरुप होईन. लोकांत आनंद पसरवीन. अरण्यात देखील संकट ठरणार नाही. केवळ आनंद पसरेल.

हे जसे संगतीचे चोखट सांगणे, तसेच कुठे राहावे याबद्दलही उपदेशिणे. तुकोबा म्हणतात,

सुख पंडरीशी आले। पुंडलिके साठविले ।।

ते पुंडलिकासारख्या मातृपितृभक्ताचे घर आहे. तेथे सुखाशिवाय कसल्या राशी? वास्तव्य करावे अशापाशी.

अशी पाहावी जागा, जिथे जीवा न योगा।

अशीसारखा तेजस्वी, पण वास्तव्य करुन बसला लोखंडापाशी. आले केवल घाव सोसणे भाथी. अभी लोखंडात राहायला गेला. देदीप्यमान असूनही लोहाराकडून बडवला गेला. धणाचे आघात घेत घायाळ झाला. वस्ती नको तेथे केली, जीवनाची धूळधाण झाली. समर्थ रामदास म्हणतात.

ज्या जैसी संगती। त्यासी तैसी गती।
अनायासे गती चुके अधोगती। धरिता संगती सज्ञनांची ।।

– किशोर गांधी

# राजेंद्र टाक यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर



नगर – शहरातील गायक, निवेदक आणि कथाकार राजेंद्र टाक यांना जिल्ह्यातील इच्छापूर्ती प्रतिष्ठानचा या वर्षीचा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. ३० ऑगस्ट रोजी शिर्डीमध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिवसेना नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते, तर जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

गेली साडे तीन ते चार दशकं कलाक्षेत्रात ७ ते ८ हजार वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे सादरीकरण करत मनोरंजनासोबतच प्रेरणादायी, प्रबोधनात्मक, माहितीप्रद अशा कार्यक्रमांची निर्मिती टाक यांनी केली.

गायन – निवेदन क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांकरिता त्यांनी स्पर्धा, कार्यशाळांचे आयोजन करून अनेकांना मार्गदर्शन केले. आध्यात्मिक क्षेत्रातही अनेक कॅसेट, सिडीज, माहितीपट तयार करून संतचरित्रही त्यांनी समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले.

सामाजिकतेचे भान राखत त्यांनी अनेक ठोस आणि भरीव उपक्रम राबविले. कथा आणि प्रवचनाच्या माध्यमातूनही त्यांनी आध्यात्मिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले. ज्यामुळे ते कलाक्षेत्रात एक आदर्शवत व्यक्तिमत्व ठरले आहेत. नुकतेच त्यांना उडान फाउंडेशनच्या उडान पुरस्काराने गौरविण्यात आले. राज्यशासनाने विशेष कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्त करून त्यांचा उचित सन्मान केला आहे.

गायनाचे कार्यक्रम करत असताना आकाशवाणीकरिता उद्घोषक, स्थानिक वाहिनीवर वृत्तनिवेदक ते कथाकार अशा त्यांच्या कलाक्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना समाजरत्न पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

# दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला 'काजवा'ची साथ

## जि. प. शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

नगर – शिक्षणाची आवड आणि गुणवत्ता असूनही आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, या उद्देशाने कार्यरत असलेल्या 'काजवा संस्था' यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.



दुर्गम भागातील जि. प. शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना काजवा संस्थेचे पदाधिकारी.

या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळा देवीची वाडी (लाडगाव) तसेच गुणवत्तापूर्ण शैक्षणिक उपक्रमांमुळे नावारूपास येत असलेल्या जिल्हा परिषद शाळा रणद बुद्रुक (रंधा धबधबा परिसर) येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे संच देण्यात आले. या संचामध्ये वह्या, पेन, पेन्सिल, चित्रकलेचे साहित्य तसेच खाऊचा समावेश होता.

काजवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रविण धांडे व ट्रस्टी सपना धांडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमास ॲड. पोपरे सर, अरुण गोंदके सर, शाळेचे शिक्षक सरोक्ते सर, कातडे सर, प्रकाश धोंगडे यांच्यासह लाडगाव व रणद बुद्रुक येथील ग्रामस्थ, शाळा पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी काजवा संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी काजवा संस्थेचे पदाधिकारी रुपाली काळे, हरिदास धांडे, अंकुश काळे, योगीता सूर्यवंशी, रजनी धांडे उपस्थित होते.काजवा संस्था केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरती मर्यादित न राहता समाजातील गरजू घटकांसाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेच्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिरे, महिला सबलीकरण, संस्कृती संवर्धन आणि रोजगार निर्मिती यांसारख्या क्षेत्रांतही सातत्याने काम केले जात असल्याचे संस्थापक अध्यक्ष प्रविण धांडे यांनी सांगितले.

दुर्गम आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रम ाचे ग्रामस्थ व शिक्षकांनी स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणाऱ्या अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळत असून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळत आहे.

# ई कचरा संकलनाची फलश्रुती; १० गरजू शाळांना मिळाले संगणक



विचार भारतीच्या कोहिनूर मॉलमधील ई कचरा संकलन केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी १० शाळांना संगणकांचे वितरण करण्यात आले. यावेळी श्रीमती नीता गांधी, माजी सहाय्यक आयुक्त प्रशांत खांडकेकर, रवींद्र मुळे, भगवान फुलसौंदर, सुधीर लांडगे, उदय भणगे आदींसह पदाधिकारी व विद्यार्थी.

नगर – विचार भारतीच्या वतीने कोहिनूर मॉलमध्ये सुरु झालेल्या स्थायीस्वरूपाच्या ई कचरा संकलन केंद्राचे उत्साहात उद्घाटन झाले. कोहिनूरच्या संचालिका श्रीमती नीता गांधी यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून या केंद्राचे उद्घाटन केले. उद्घाटनानंतर नागरिकांनी उत्स्फूर्तपणे बंद पडलेले व वापरत नसलेल्या इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रिकल उपकरणे येथे जमा केली. या कार्यक्रमात ई कचरा संकलन उपक्रमात जमा झालेल्या संगणकांची उत्तमरीत्या दुरुस्ती केलेल्या वापरण्याजोगे करण्यात आलेल्या १० संगणकांचे वितरणही शहरातील १० गरजू शाळांना करण्यात आले. ही या उपक्रमाची फलश्रुती असून हरित अहिल्यानगर या विचारभारतीने सोडलेल्या संकल्पाची एक आश्वासक वाटचाल आज सुरू झाली.

या कार्यक्रमास माजी सहाय्यक आयुक्त प्रशांत खांडकेकर, माजी महापौर भगवान फुलसौंदर, विचार भारतीचे अध्यक्ष सुधीर लांडगे, ई कचरा संकलन उपक्रमाचे समन्वयक उदय भणगे आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक, विद्यार्थी, शिक्षक व नगरसेवक उपस्थित होते. कोहिनूर मॉलमध्ये हे ई कचरा संकलन केंद्र कायमस्वरूपी सुरु राहणार आहे.

यावेळी नीता गांधी म्हणल्या, कोहिनूर मॉलमध्ये ई कचरा संकलन केंद्र विचार भारतीने सुरु करून महत्वाचा व कौतुकास्पद उपक्रम राबवला आहे. कोहिनूर मॉल कायमच आशा सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होत आहे. भविष्यातील प्रदूषण रोखण्यासाठी असे ई कचरा संकलन केंद्र शहरात ठिकठिकाणी व्हावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रशांत खांडकेकर म्हणाले, वाढत चाललेला ई कचरा जर आत्ताच गांभीर्याने घेतला नाहीतर भविष्यात ही खूप गंभीर समस्या होणार आहे. त्यामुळे विचार भारतीने ई कचरा निर्मूलनासाठी टाकलेले पाउल खूप महत्त्वपूर्ण आहे. या उपक्रमात सहभागी होत घन कचरा निर्मुलन साठीही उपाय योजना राबविणार आहे.

यावेळी उदय भणगे यांनी ई कचरा निर्मुलन उपक्रमाची सविस्तर माहिती देऊन नागरिकांचा उत्स्फूर्त सहभागाबद्दल आभार मानले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सुधीर लांडगे यांनी विचार भारतीच्या उपक्रमांची माहिती दिली. प्रशांत आढाव यांनी सूत्रसंचालन केले व आभार राजेश झंवर यांनी मानले. यावेळी जनजाती कल्याण आश्रमाचे जिल्हाध्यक्ष अरविंद पारगावकर, रवींद्र मुळे, उद्योजक गौतम मुनोत, भाजपा जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, क्रेडाईचे अध्यक्ष गिरीश अग्रवाल, ऐसाचे अध्यक्ष प्रदीप तांदळे, अरविंद कोकणे, महेंद्र चंदे, अशोक गायकवाड, राहुल गांधी, सुनील नागोरी, डॉ.निळकंठ ठाकरे, डॉ. नीरज करंदीकर, नितीन थोरात, सुरेश खामकर, दीप्ती गुंदेचा आदींसह नागरिक उपस्थित होते.

# पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजमध्ये वृक्षारोपण

नगर – नारायण डोह येथील डॉ. एन. जे. पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजच्या परिसरात सेवा शिक्षण प्रसारक मंडळ व सामाजिक वनीकरण परिक्षेत्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले. यात करंज, निलगिरी, जांभूळ, आंबा, बहावा, बांबू आदींसह विविध १०० वृक्षरोपांचे रोपण करण्यात आले.




नारायणडोह येथील डॉ. पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजमध्ये वृक्षारोपणप्रसंगी शैलेश बडदे, वैशाली दराडे, सुभाष जाधव तसेच संस्थेचे पदाधिकारी, सर्व युनिटचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकवृंद आदी. (छाया – विजय मते)

यावेळी सामाजिक वनीकरण परिक्षेत्राचे अधिकारी वनपाल शैलेश बडदे, वनरक्षक वैशाली दराडे, सेवानिवृत्त वनाधिकारी सुभाष जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, तज्ञ संचालक डॉ. रेखा राणी खुराणा, संचालक साई पाऊलबुधे, आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब पागिरे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. श्याम पंगा, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य सुचित्रा डावरे, बीएडच्या प्राचार्य डॉ. प्राची मचे, डीएडच्या प्राचार्य सविता सानप आदींसह प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी वनपाल बडदे म्हणाले, आज मानवाचे अस्तित्व टिकविण्यासाठी आणि पृथ्वीवरील समतोल राखण्यासाठी प्रदूषण कमी करण्याची खरी गरज आहे. यासाठी जास्तीत जास्त झाडे लावून निसर्गाचे हानी रोखणे ही देखील काळाची गरज असल्याने आपण सर्वांनी पर्यावरणाचे रक्षण केले तरच आपले संगोपन होईल. पर्यावरण संरक्षणात प्रत्येकाची वैयक्तिक भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. यासाठी प्लास्टिकचा वापर टाळा, झाडे लावा, वीज व पाणी वाचवा आणि कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन केले तर आपण निसर्गाचे संतुलन राखू शकतो, असे आवाहन त्यांनी केले.

सूत्रसंचलन अपर्णा केसकर यांनी केले. आभार डॉ. प्राची मचे यांनी मानले.



हातवळण येथे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करताना अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन ट्रस्टचे पदाधिकारी.

# हातवळण येथे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप; अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन ट्रस्टचा सामाजिक उपक्रम

नगर – ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला पाठबळ देण्यासाठी आणि आर्थिक परिस्थितीमुळे कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये या उदात्त हेतूने अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने हातवळण (ता. नगर) येथे एका विशेष सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हातवळण येथील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.


सामाजिक व शैक्षणिक बांधीलकी जपण्याच्या उद्देशातून आयोजित या उपक्रमात शाळेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या,पेन, कंपास पेटी, रंगपेटी व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य वितरित करण्यात आले. शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीलाच आवश्यक साधने मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

हातवळण ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन ट्रस्टच्या या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक करण्यात आले. फाउंडेशनने दाखवलेल्या या सामाजिक संवेदनशीलतेबद्दल ग्रामपंचायत पदाधिकारी व मुख्याध्यापकांनी फाउंडेशनचे आभार मानले.

या कार्यक्रमाला ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन ट्रस्टचे सचिव संदीप नवसुपे मनोज सोनवणे दीपक शिंदे अशोक गाढे सिध्दांत पानसरे शशिकांत भांबरे व सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते,आजी माजी सरपंच, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा सांगता समारंभ अत्यंत उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त नेत्र तपासणी व संधिवात शिबीर

नगर – भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दिल्लीगेट पटांगण येथे मोफत नेत्र तपासणी आणि संधिवात शिबिराचे आयोजन करण्यात आले.



भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त नेत्र तपासणी व संधिवात तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी डॉ.आदित्य खडामकर, डॉ.अदिती पाटणकर–देशपांडे तसेच विक्रम पाठक, संजय सागावकर, गजेंद्र सोनवणे, विजय मानकर, छाया साळी आदी.

धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष होते. तसेच अचानक उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांसाठी होणारा औषधोपचाराचा खर्च परवडत नसल्याने अनेकजण उपचाराकडे दुर्लक्ष करतात. अशा परिस्थितीत या शिबिराच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी उपलब्ध करून दिल्याने अनेक रुग्णांना मोठा लाभ झाला.

शिबिराच्या माध्यमातून आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्याने अनेकांचे जीवन सुखकर होत आहे, असे प्रतिपादन स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी केले.

भगवान जिव्हेश्वर मंदिर, दिल्लीगेट पटांगण आणि स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ, बागडपट्टी यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर घेण्यात आले. शिबिरात मोफत संधिवात तपासणी, नेत्र तपासणी तसेच अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तगट तपासणी करण्यात आली. सुरुवातीला श्री जिव्हेश्वर भगवान यांचे पूजन करण्यात आले. यानंतर शिबिराचे उद्घाटन नेत्रतज्ञ डॉ. आदित्य खडामकर आणि संधिवात व सांधेरोग तज्ज्ञ डॉ. अदिती पाटणकर–देशपांडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

याप्रसंगी विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, विश्वस्त संजय सागावकर, खजिनदार गजेंद्र सोनवणे, सचिव विजय मानकर, उत्सव समितीचे प्रमुख नीरज चांगटे, राजेंद्र गर्जे, बबन शेख, मुकुंद सावेकर, अंबादास बडे, स्वकुळ साळी महिला मंचच्या अध्यक्ष छाया साळी, वनिता पाटेकर, वनिता मानकर, विद्या मानकर, मनीषा खडामकर, सायली खडामकर यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

विश्वस्त संजय सागावकर म्हणाले, दरवर्षी भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना सेवा देणे हाच आमचा मुख्य उद्देश आहे. या शिबिराला समाजातून दरवर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो.

सूत्रसंचालन बबन शेख यांनी केले तर आभार सचिव विजय मानकर यांनी मानले.

# 'स्नेहबंध' च्या वृक्षारोपण उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग

नगर – वाढते प्रदूषण आणि बदलते हवामानाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी सावेडी येथील संजीवनी फौंडेशन संचलित मूकबधिर विद्यालयाच्या परिसरात स्नेहबंध सोशल फौंडेशन, अहिल्यानगरतर्फे वृक्षारोपण करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा शुभारंभ झाला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बी. के.जगधने, शिक्षक तसेच विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे वृक्षारोपणात सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. केवळ झाडे लावणे नव्हे, तर त्यांचे नियमित संगोपन करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.



राजेंद्र बलदोटा यांना नेत्रगौरव पुरस्कार प्रदान करताना डॉ.प्रकाश कांकरिया, सौ.डॉ.सुधा कांकरिया समवेत डॉ. बोरुडे, डॉ.चिटगोपीकर, शिरीष रायते, जालिंदर बोरुडे आदी.

# राजेंद्र बलदोटा यांना नेत्रगौरव पुरस्कार प्रदान

नगर - साईसूर्य नेत्रसेवा यांच्यावतीने नेत्रदान चळवळीत उल्लेखनीय कार्य करणारे राजेंद्र बलदोटा यांना नेत्रदानसूचक म्हणून नेत्रगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

संजीवनी एजन्सीजचे संचालक असलेले राजेंद्र बलदोटा हे ऑल इंडिया जैन कॉन्फरन्सचे डायरेक्टर आहेत. मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचे समुपदेशन करून त्यांना नेत्रदानासाठी तयार करणे.आणि ते घडवून आणणे. नेत्रसेवेच्या कार्यात बलदोटा यांनी अनेक वर्षापासून योगदान दिले आहे. नेत्रदान चळवळीतील त्यांचे योगदानाची दखल घेऊन त्यांना नेत्रगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी डॉ.प्रकाश कांकरिया, सौ.डॉ.सुधा कांकरिया, ऑप्थॅल्मोलॉजी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बोरुडे, डॉ.चिटगोपीकर, रोटरी क्लबचे शिरीष रायते, फिनिक्स फौंडेशनचे जालिंदर बोरुडे आदी उपस्थित होते.

यावेळी ज्या नातेवाईकांनी आपल्या आप्तांचे नेत्रदान केले, अशा नेत्रदात्यांच्या कुटुंबीयांचाही यावेळी सत्कार करून त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# सीमेवरील जवानांसाठी दरेवाडीच्या विद्यार्थिनींच्या हातून प्रेमाची राखी



डाक विभागाच्या दिल से सरहद तक उपक्रमात सहभाग घेत सीमेवरील जवानांसाठी राख्या पोस्टमास्तर संतोष यादव यांच्याकडे सुपूर्द करताना दरेवाडी येथील श्री मळगंगा माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींनी

नगर - रक्षाबंधनाच्या पवित्र सणाचे औचित्य साधून देशाच्या सीमेवर अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भारतीय डाक विभागाच्या वतीने दिल से सरहद तक हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. अहिल्यानगर विभागात वरिष्ठ अधीक्षक डाकघर विकास पालवे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाला विविध शाळांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या उपक्रमांतर्गत दरेवाडी येथील श्री मळगंगा माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींनी राख्या भारतीय सैनिकांसाठी पोस्टमास्तर संतोष यादव यांच्याकडे सुपूर्द केल्या. विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात हा उपक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका हेमलता मगर होत्या. यावेळी बोलताना पोस्टमास्तर संतोष यादव यांनी सांगितले की, देशाच्या संरक्षणासाठी सीमेवर सेवा बजावणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मिळत आहे. विद्यार्थिनींनी प्रेमाने तयार केलेल्या या राख्या भारतीय डाक विभागामार्फत सुरक्षितपणे व वेळेत सीमेवर कार्यरत असलेल्या जवानांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत.

डाक विभाग सातत्याने सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम राबवत असून, 'दिल से सरहद तक' हा उपक्रम देशप्रेमाची भावना वृद्धिंगत करणारा असल्याचे संतोष यादव यांनी सांगितले. विद्यालयाने या उपक्रमात सहभागी होत सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त केल्याबद्दल त्यांनी मुख्याध्यापिका, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भारत गोल्हार सर यांनी केले. यावेळी गावाच्या पोस्टमास्तर तेजश्री काळदाते, शुभम शेळके, नवनाथ शिंदे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

आमच्या शाळेला भारतीय डाक विभागाच्या 'दिल से सरहद तक' या उपक्रमात सहभागी होता आले, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या राख्या सीमेवर असलेल्या जवानांच्या हातावर बांधल्या जातील, हा क्षण निश्चितच आमच्यासाठी अविस्मरणीय असेल, असे मुख्याध्यापिका हेमलता मगर यांनी सांगितले.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या पालक-शिक्षक सहविचार सभेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या पालक-शिक्षक सहविचार सभेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

नगर - शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयात पालक-शिक्षक सहविचार सभा उत्साहात पार पडली. यावेळी इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, स्कूल कमिटी सदस्य शामराव व्यवहारे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कैलास लोंढे, राजमुद्रा अकॅडमीच्या संचालिका नंदाताई पांडुळे, इमरान तांबोळी, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर, माध्यमिकचे प्रभारी मुख्याध्यापक महादेव भद्रे यांच्यासह शालेय शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी महापौर गाडे म्हणाल्या, प्राथमिक शिक्षण हे मुलांच्या उज्ज्वल भविष्याचा भक्कम पाया असते. याच टप्प्यावर विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबरोबरच संस्कार, शिस्त, आत्मविश्वास आणि विविध गुण विकसित होत असतात. मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असली, तरी मातृभाषेतूनही विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण घेता येते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी शाळा व शिक्षकांना सहकार्य करावे; मात्र मुलांवर अपेक्षांचे अनावश्यक ओझे लादू नये, असे आवाहन महापौर गाडे यांनी केले.

प्रारंभी लक्ष्मीबाई व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांनी पालक-शिक्षक सहविचार सभेत पालकांशी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीपासून ते पोषण आहार, आरोग्य, आहाराच्या सवयी तसेच विविध परीक्षांची तयारी या विषयांवर संवाद साधला.

प्रास्ताविक ज्ञानदेव पांडुळे यांनी केले. कैलास लोंढे यांनी शैक्षणिक प्रबोधनाबरोबरच अंधश्रद्धा निर्मूलनाच्या विषयावर पालकांना मार्गदर्शन केले.

आमदार संग्राम जगताप यांनीही कार्यक्रमाला भेट देऊन गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

यावेळी नगरसेवक बाळासाहेब पवार, निखील वारे तसेच माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनीही गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सरफराज शेख याने राज्यात ११वा क्रमांक पटकावला असून, तब्बल २९ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झाले आहेत. तसेच प्रज्ञाशोध परीक्षेतही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सूत्रसंचालन प्रदीप पालवे यांनी केले. आभार मंगेश कारखिले यांनी मानले.



भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त बागडपट्टी येथे लक्ष्मीनारायण मंदिरात पूजा प्रसंगी उपस्थित मान्यवर.

# भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव बागडपट्टी येथे साजरा

नगर - स्वकुळसाळी समाजाचे आराध्य दैवत भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव बागडपट्टी येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिरात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

जन्मोत्सवानिमित्त पहाटे ५ ते ६ या वेळेत भगवान श्री जिव्हेश्वर मूर्तीचा महाअभिषेक सौ. जयश्री व श्री. उमेश कोदे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर सकाळी ६ ते ७ या वेळेत भगवान श्री जिव्हेश्वर ग्रंथाचे वाचन सौ. शकुंतला कांबळे यांनी केले. सकाळी ९.३० वाजता श्री जिव्हेश्वर भगवान यांच्या पालखीचे पूजन सौ. आरती व श्री. निरंजन पाठक यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी स्वकुळ हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, विश्वस्त संजय सागावकर, खजिनदार गजेंद्र सोनवणे, सचिव विजय मानकर, लक्ष्मीकांत तरोटे, जितेंद्र लांडगे, उत्सव समितीचे प्रमुख निरज चांगटे, बाबासाहेब वैद्य, अभिजीत अष्टेकर, सुनील पावले, प्रवीण जुंदरे, किशोर विंचुरकर, सुरेश इंगळे, प्रसाद कांबळे, संजय दळवी, सोमनाथ खाडे, प्रताप मारवाडे, उल्हास ढोरे, अशोक शेकटकर, अनिल भंडारे, श्री. पिंपरकर, ज्ञानेश्वर धिरडे, निलेश मिसाळ, श्रीकांत शेकटकर, श्रीमती छाया साळी, सौ. वनिता पाटेकर, सुरेखा शेकटकर, शुभदा वल्ली, सोनिया पाठक, स्नेहा पाठक, शकुंतला कांबळे, सौ. आडसुळ, सौ. गवते, सौ. खोपे, श्रीमती चांगटे, सौ. येवलेकर, श्रीमती डफळ,सौ.मिसाळ, सौ. तरोटे, श्रीमती कुचेकर, सौ. खडामकर आदींसह समाज बांधव व भगिनी उपस्थित होते.

# मानसी डान्स स्टुडिओच्यावतीने मंगळागौर शिबिराचे आयोजन

नगर - एकविरा चौक, पद्मा नगर पूर्णवादी बँकेजवळ, सावेडी, पाईपलाईन रोड येथील मानसी डान्स स्टुडिओच्या वतीने महिलांसाठी मंगळागौर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराची सुरुवात २४ ऑगस्ट रोजी झाली असून ते ३० ऑगस्ट पर्यंत चालणार आहे, या प्रशिक्षित महिला शिबिरार्थींचा समारोप मंगळागौर उत्सव १ सप्टेंबर रोजी सायं. ६ ते ९ या वेळेत माऊली सभागृह, सावेडी रोड येथे होणार असल्याची माहिती प्रशिक्षिका मानसी गायकवाड यांनी दिली.

सगळ्या महिलांना मंगळागौरीची उत्सुकता असते. काही महिलांना मंगळागौर गाणी म्हणण्याची आवड असते तर काही महिलांना गाणी ऐकण्याचा छंद असतो तर काहींना मंगळागौर गाण्यावर नृत्य - खेळ पाहण्याचा आनंद असतो. या उद्देशाने महिलांना या उत्साहात आनंद देण्यासाठी गेले ४ वर्षापासून मानसी डांस स्टुडिओच्या वतीने अहिल्यानगर शहरात महिलांचे कलागुण प्रकटहोणकरीता श्रावण महिन्यात मंगळागौर शिबिराचे आयोजन केले जाते,शिबीरात मंगळागौर नृत्य त्यातील वेगवेगळे खेळ आणि मंगळागौर गाणे शिकविली जाणार आहे.

तसेच नोकरदार महिलांसाठी शनिवार व रविवारची बॅच देखील उपलब्ध असणार आहे. जास्तीत जास्त महिलांनी सहभागी होण्याचे आव्हान प्रशिक्षिका मानसी प्रणेश गायकवाड यांनी केले आहे.

नाव नोंदणीसाठी सीमा विक्रम देशमुख (९६८९३५२०११), अर्चना संतोष शिंदे (९६७३७७००२६), प्रतिभा देठे (७०५८७०१७५८). संपर्क साधावा.

# 'मेगा होमिओकॉन २०२६' मध्ये डॉ. अभय मुथा यांचा विशेष गौरव



टेंभुर्णी (जि. सोलापूर) येथे 'मेगा होमिओकॉन २०२६' मध्ये नगरच्या डॉ. अभय मुथा यांचा विशेष सन्मान करताना डॉ. अरुण भस्मे समवेत डॉ. बाळकृष्ण गायकवाड व इतर.

नगर - होमिओपॅथी क्षेत्रातील डॉक्टरांनी आजपर्यंत केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी टेंभुर्णी (जि. सोलापूर) येथे 'मेगा होमिओकॉन २०२६' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास सोलापूर , अहिल्यानगर, पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यातील २५० हून अधिक वरिष्ठ होमिओपॅथिक डॉक्टर तसेच विविध होमियोपॅथिक मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात अहिल्यानगर येथील सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिकचे संचालक आणि होमिओपॅथिक व मनोलैंगिक विकार तज डॉ. अभय मुथा यांचा विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी डॉ. मुथा यांचे व्याख्यान झाले. त्यात त्यांनी आधुनिक जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर वाढत असलेल्या विविध लैंगिक समस्यांवर सविस्तर भाष्य केले. तरुणांमध्ये लैंगिक आरोग्याविषयी असलेले गैरसमज, हस्तमैथुनाबाबतच्या चुकीच्या समजुती, लैंगिक कार्यक्षमतेशी संबंधित समस्या, स्त्री-पुरुषांमधील विविध लैंगिक अडचणी तसेच वैवाहिक जीवनावर त्यांचा होणारा परिणाम याबाबत त्यांनी शास्त्रीय दृष्टिकोन मांडला.

डॉ. मुथा यांनी आपल्या तीन दशकांच्या वैद्यकीय अनुभवातील विविध उदाहरणांच्या माध्यमातून लैंगिक विकारांकडे केवळ शारीरिक समस्या म्हणून न पाहता त्यामागील मानसिक, भावनिक, जीवनशैलीशी संबंधित आणि वैद्यकीय कारणांचा विचार करण्याची गरज स्पष्ट केली. या प्रसंगी गेल्या ३० वर्षांपासून होमिओपॅथीच्या माध्यमातून केलेल्या त्यांच्या वैद्यकीय व सामाजिक कार्याबद्दल महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस , नाशिकचे सिनेट मेंबर तसेच बीड येथील होमियोपॅथिक मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरुण भस्मे यांच्या हस्ते डॉ. अभय मुथा यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास उपस्थित डॉक्टर व विद्यार्थ्यांनी डॉ. मुथा यांच्या व्याख्यानाला प्रतिसाद दिला. सदर मेगा होमिओकॉन २०२६ हा कार्यक्रम घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र होमिओपॅथिक कौन्सिलचे उपाध्यक्ष डॉ. बाळकृष्ण गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# तब्बल ४० वर्षांनंतर नगरमध्ये राज्य खो-खो स्पर्धा होणार

**राज्यभरातील सातशेहून अधिक खेळाडू, प्रशिक्षक येणार**

नगर - अस्सल मराठी मातीतील देशी खेळ मानल्या जाणाऱ्या खो-खो खेळाचा थरार नगरकर क्रीडा रसिकांना लवकरच अनुभवयास मिळणार आहे. तब्बल ४० वर्षांनंतर राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी वरिष्ठ गट खो-खो स्पर्धा नगरला होणार आहे. महाराष्ट्र असोसिएशनने नगरवर स्पर्धा आयोजनाची जबाबदारी दिली आहे. येत्या नोव्हेंबर महिन्यात दिवाळी सुट्ट्यांच्या काळात या स्पर्धेच्या माध्यमातून खो-खो खेळाची नजाकत व कौशल्य नगरकर क्रीडा रसिकांना पाहायला मिळणार आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने राज्यभरातील तब्बल सातशेवर खेळाडू नगरला येणार आहेत.

मुंबई व पुणे नंतर राज्यात अहिल्यानगरच्या खो-खो खेळाडूंचा दबदबा आहे. खो-खो क्षेत्रातील मानाचे एकलव्य, वीर अभिमन्यू, भरत, राणी लक्ष्मीबाई, जानकी, इला यासारखे राज्य व राष्ट्रीय पुरस्कार आणि जिल्हास्तरीय क्रीडा पुरस्कार तसेच क्रीडा क्षेत्रातील सर्वाधिक मानाचा शिवछत्रपती पुरस्कारही नगरच्या खो-खो खेळाडूंना मिळालेले आहेत. हा नावलौकिक मिळवणाऱ्या अहिल्यानगरला यंदा ६२ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा व निवड चाचणी घेण्याचा मान मिळाला आहे. याआधी १९८६ मध्ये अशी राज्य स्पर्धा नगरला झाली होती. त्यानंतर तब्बल ४० वर्षांनी पुन्हा एकदा अहिल्यानगरला हा मान मिळाला आहे. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्ष व उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, राज्य उपाध्यक्ष अशोक पितळे व राज्य सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव यांनी अहिल्यानगरमध्ये राज्य स्पर्धा घेण्यास मान्यता दिली आहे व तसे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष ॲड. विश्वासराव आठरे पाटील व खजिनदार गौरव पितळे यांना कळवले आहे. त्यामुळे आता त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा आयोजनाची तयारी सुरू झाली आहे.

६१ वी राज्य अजिंक्यपद स्पर्धा मागील वर्षी बीड येथे झाली होती. यंदाची ६२ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद वरिष्ठ गट खो-खो स्पर्धा व निवड चाचणी नगरला होणार आहे. राज्यभरातील विविध जिल्ह्यांचे २४ पुरुष व २४ महिला असे ४८ संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या संघांचे मिळून सातशेवर खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, व्यवस्थापक, स्पर्धा पंच, क्रीडाधिकारी मिळून सुमारे एक हजारजण यानिमित्ताने अहिल्यानगरला येणार आहेत. नगरला याआधीची राज्य खो-खो स्पर्धा ४० वर्षांपूर्वी झाली होती. त्यामुळे बऱ्याच काळाने यंदाच्या नगरच्या स्पर्धेच्या निमित्ताने नगरमधील युवा खेळाडूंना राज्यातील सर्वोत्तम खो-खो खेळाडूंना प्रत्यक्ष पाहण्याची व त्यांचे कसब अनुभवण्याची संधी मिळणार आहे. यानिमित्ताने या खेळाडूंचे कौशल्य शिकण्याची व राज्यस्तरीय क्रीडा वातावरणाचा अनुभवही मिळणार आहे. खो-खो खेळातील खेळाडूंची पळती व त्यांना बाद करण्यासाठी प्रतिस्पर्धी खेळाडूंचे लागणारे कसब याचा थरार नगरला यानिमित्ताने रंगणार आहे.

### राज्याचे संघ निवडले जाणार

अहिल्यानगरला पाच दिवस होणाऱ्या राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत सहभागी राज्यभरातील खेळाडूंमधून सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी निवड होणार आहे. यातून राज्याचे पुरुष व महिला असे दोन संघ निवडले जाणार आहेत. हे दोन्ही संघ राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणार आहेत.

# डॉ. सुजय विखे पाटील यांची आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदी नियुक्ती



डॉ. सुजय विखे पाटील यांची आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सत्कार केला.

नगर - भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली २४ ऑगस्ट रोजी पक्षाच्या विविध प्रकोष्ठांच्या प्रभारी व सहप्रभारींच्या नियुक्त्या करण्यात आल्या. यामध्ये भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांची आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर डॉ. विखे पाटील यांच्याकडे पक्षाने आणखी एक महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. पक्ष संघटनेच्या कामात विविध स्तरांवर सक्रिय असलेल्या डॉ. विखे पाटील यांच्या कामाची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आल्याचे पक्षातील कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी आरोग्य, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सातत्याने काम केले आहे. प्रदेश उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतरही त्यांनी पक्ष संघटनेच्या कामात सक्रिय सहभाग कायम ठेवला आहे. राज्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवत पक्षाने दिलेल्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडण्यावर त्यांनी भर दिला आहे.

आता आयुष्मान भारत प्रकोष्ठाच्या प्रदेश प्रभारीपदाची जबाबदारी मिळाल्याने केंद्र शासनाच्या आरोग्यविषयक योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासह प्रकोष्ठाचे काम राज्यभर अधिक प्रभावीपणे राबविण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या या नियुक्तीबद्दल भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# मसाप नगर शाखेचा ३० ऑगस्टला मेळावा; चांदबिबी महालावर होणार कवितांची बरसात

नगर - महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अहिल्यानगर शाखेच्यावतीने ३० ऑगस्ट रोजी श्रावणधारा खुल्या काव्य संमेलनाचे व सभासदांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती परिषदेचे अध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे व कार्यवाह शिल्पा रसाळ यांनी दिली.

सुप्रसिद्ध कवी, गीतकार प्रकाश घोडके हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. नगरचे ऐतिहासिक भूषण असलेल्या चांदबिबी महाल येथे सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत काव्य संमेलन व सभासदांचा मेळावा होणार आहे. श्रावणामध्ये विविध सण, उत्सवांना प्रारंभ होतो. पाऊसही हजेरी लावतो. एकूणच वातावरण प्रसन्न आणि उत्साहवर्धक असते. अशा उत्साही वातावरणात मसापच्या वतीने श्रावणधारा खुल्या काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या काव्य संमेलनात नगर मधील कवींनी सहभागी व्हावे, असे आवाहन कार्याध्यक्ष रवींद्र चोभे व कार्यक्रमाचे संयोजक राजेंद्र उदागे यांनी केले आहे. श्रावणधारा खुल्या काव्य संमेलनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कवींनी नाव नोंदणीसाठी कोषाध्यक्ष डॉ. शितल म्हस्के (मो.९८२२०५४५२४), उपाध्यक्ष डॉ. श्याम शिंदे (मो. ९८६०२४५३८७), संयोजक राजेंद्र उदागे (मो. ९८५०७१६६६६), कार्यकारणी सदस्य पोपटराव धामणे (मो. ९४०५००१७३०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सहकार्यवाह शिवाजी साबळे यांनी केले आहे. या कार्यक्रमास कवींनी व सभासदांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मसाप नगर शाखेच्यावतीने करण्यात आले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गरमागरम पोहा भजी

झटपट रेसिपी

मित्रांनो, कांदा, बटाटा, पालकाची भजी आपण नेहमीच खातो. पण काहीतरी वेगळं करायचं असेल तर पोह्यांची भजी करता येईल. अगदी झटपट होणारी सोपी अशी ही रेसिपी आहे. संध्याकाळी चहासोबत ही भजी छान लागतील. हॉस्टेलमधल्या निवांत रविवारी तुम्ही हा प्रकार ट्राय करू शकता.



**सामग्री:** एक कप पोहे, अर्धा चमचा कॉर्न फ्लोर, दोन बारीक चिरलेले कांदे, दोन बटाटे, मीठ, चवीनुसार तिखट, तळण्यासाठी तेल आणि चिरलेली कोथिंबिर

**कृती:** पोहे एका भांड्यात काढून घ्या. त्यात कांदा, लाल तिखट, कॉर्न फ्लोर, कोथिंबिर आणि मीठ घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. बटाटे उकडून घ्या. हे बटाटे नीट कुस्करून घ्या. पोह्यांच्या मिश्रणात घालून मिसळून घ्या. आता या मिश्रणाचे छोटे गोळे तयार करा. कढईत तेल तापवा. हे गोळे अलगदपणे तेलात सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. पोह्यांची ही चविष्ट भजी सॉससोबत खाता येईल.




## शेर की जुबानी


कर दिया हमनें भी इजहार-ए-मोहब्बत फोन पर...लाख रुपये की बात थी,एक रुपये में हो गई।

जब तू होती थी मेरी जदगी में, तो तेरे मेरे इश्क के चर्चे बहुत थे, अच्छा हुआ की जदगी से चली गई तू, क्योंकि तेरे खर्चे बहुत थे...

हजार जवाबों से अच्छी है खामोशी मेरी, ना जाने कितने सवालों की आबरू रखती है।

# कला शाखेतील रोजगारसंधी

करीअरवेध



बऱ्याच काळापासून असा समज होता की, बारावीत आर्ट्समध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडे करीअरचे पर्याय कमी असतात. बदलत्या काळानुसार हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. तंत्रज्ञान, मीडिया, आरोग्य आणि कल्याण, तसेच सेवा क्षेत्राच्या जलद विस्तारामुळे आर्ट्सच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. आता कमी वेळात उत्तम करिअर आणि चांगल्या पगाराचा मार्ग मोकळा करू शकतील असे अनेक व्यावसायिक आणि कौशल्य-आधारित अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. आज कंपन्या केवळ पदवीला नव्हे, तर संवादकौशल्य, चिकित्सक विचार, सर्जनशील विचार, समस्या निराकरण आणि आंतरवैयक्तिक कौशल्यांना प्राधान्य देतात. परिणामी, आर्ट्सचे विद्यार्थी अनेक वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांमध्ये आपले मजबूत स्थान निर्माण करत आहेत. आर्ट्समध्ये शिक्षण घेतल्याने विद्यार्थ्यांना भाषा, लेखन, विश्लेषण आणि उत्तम संवादकौशल्ये विकसित करण्यास मदत होते. डिजिटल युगात, मीडिया मार्केटिंग, डिझाइन, हॉस्पिटॅलिटी आणि मानसशास्त्र यासारख्या क्षेत्रांमध्ये या कौशल्यांना मोठी मागणी आहे. याव्यतिरिक्त, सरकारी आणि खासगी क्षेत्रांमध्येही मोठी संधी आहे.

**हॉस्पिटॅलिटी, पर्यटन आणि इव्हेंट मॅनेजमेंट**

हॉस्पिटॅलिटी उद्योग हा देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक आहे. हॉटेल, एअरलाइन, पर्यटन, लक्झरी सेवा आणि इव्हेंट मॅनेजमेंटमध्ये प्रशिक्षित तरुणांची मागणी वाढत आहे. बारावी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी हॉटेल मॅनेजमेंट किंवा हॉस्पिटॅलिटीसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये करिअर करू शकतात. हे क्षेत्र हॉटेल मॅनेजर, इव्हेंट प्लॅनर, एअरपोर्ट ऑपरेशन्स एक्झिक्युटिव्ह, ट्रॅव्हल कन्सल्टंट, पर्यटन व्यावसायिक आणि गेस्ट रिलेशन्स एक्झिक्युटिव्ह यांच्यासाठी महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध करून देते.

**मानसशास्त्र, आरोग्य व निरोगीपणा**

मानसिक आरोग्याबद्दल वाढत्या जागरूकतेमुळे, मानसशास्त्र आणि समुपदेशन क्षेत्रातील व्यावसायिकांची मागणी लक्षणीयरीत्या वाढली आहे. कला शाखेचे विद्यार्थीदेखील मानसशास्त्रासारख्या अभ्यासक्रमांद्वारे या क्षेत्रात प्रगती करू शकतात. समुपदेशक, क्लिनिकल सायकॉलॉजी व्यावसायिक, एचआर व्यावसायिक, बिहेवियर एक्सपर्ट आणि आरोग्य समुपदेशक हे या क्षेत्रातील प्रमुख करिअर पर्याय आहेत.

**डिजिटल मीडिया आणि डिजिटल मार्केटिंग**

डिजिटल प्लॅटफॉर्मच्या वाढत्या वापरामुळे, कंटेंट क्रिएशन, सोशल मीडिया, एसइओ ब्रँडिंग आणि डिजिटल मार्केटिंग व्यावसायिकांची मागणी सातत्याने वाढत आहे. आर्टसचे विद्यार्थी पदवी किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाद्वारे या क्षेत्रात सहजपणे करिअर सुरू करू शकतात. कंटेंट रायटर, कंटेंट स्ट्रॅटेजिस्ट, सोशल मीडिया मॅनेजर, ब्रँड एक्झिक्युटिव्ह आणि डिजिटल मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह ही या क्षेत्रातील प्रमुख नोकरीची पदे आहेत. आर्ट्सच्या विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक पदव्या आणि कौशल्य-आधारित अभ्यासक्रम उपलब्ध आहेत, जे विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी देऊ शकतात. यामध्ये बॅचलर ऑफ बिझनेस डमिनिस्ट्रेशन, बीए इन सायकॉलॉजी, बॅचलर ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, बीए एलएलबी, बॅचलर ऑफ जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन, बॅचलर ऑफ फाईन आर्ट्स, फॅशन डिझाइन आणि इंटिरियर डिझाइन यांचा समावेश आहे.

# मिस्ड कॉलमधून कोट्यवधींचा व्यवसाय

अचिव्हर

अमेरिकेत स्थायिक भारतीय वंशाच्या अपूर्व श्रीवास्तव यांनी लहानपणी वडिलांच्या व्यवसायात काम करताना मिस्ड कॉलमागील आर्थिक नुकसान जवळून पाहिले. पुढे याच अनुभवातून त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून व्यवसायांचे एकही ग्राहक कॉल चुकू न देणारे तंत्रज्ञान विकसित केले. मिस्ड कॉलसारख्या छोट्याशा समस्येतून उभी राहिलेली त्यांची कंपनी आज एआय क्षेत्रातील चर्चेचा विषय ठरली आहे.

आपल्या फोनवर येणारा मिस्ड कॉल बहुतेक जण दुर्लक्ष करतात; पण एका भारतीय वंशाच्या युवकाने या छोट्याशा गोष्टीतून मोठी संधी पाहिली. आज त्याने अमेरिकेत एक अशी 'एआय' कंपनी उभी केली आहे, जिचे मूल्य ८३०० कोटी रुपयांवर पोहोचले आहे.

'एमआयटी'चे माजी विद्यार्थी अपूर्व श्रीवास्तव यांच्या 'अप्होका' या कंपनीने छोट्या व्यवसायांना क्रांतिकारी बदल घडवून आणला आहे. ही कंपनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने कॉल्स मिस होऊ देत नाही. अपूर्व यांचे बालपण अमेरिकेतील मिशिगनमध्ये गेले. त्यांच्या आई-वडिलांचा छोटा व्यवसाय होता. तिथे ते ग्राहकांच्या फोनला उत्तर देत असत. त्या वेळी त्यांच्या लक्षात आले, की एक चुकलेला कॉल म्हणजे थेट व्यवसायाचे नुकसान. हाच अनुभव पुढे त्यांच्या यशाचा पाया बनला.



२०२२ मध्ये त्यांनी आपल्या मित्र टायसन चेन यांच्यासोबत 'प्होका' कंपनी सुरू केली. दोघांनीही लहानपणी ही समस्या अनुभवली होती. त्यांनी असा 'एआय व्हॉइस एजंट' तयार केला, जो माणसाप्रमाणे बोलतो. अपॉइंटमेंट बुक करतो. कॅलेंडर तपासतो आणि गरज पडल्यास कोटेशन्सचा पाठपुरावा करतो. सुरुवातीला रेस्टॉरंट्ससाठी सुरू केलेले हे तंत्रज्ञान नंतर 'होम सर्व्हिसेस' क्षेत्रात (एसी, प्लंबिंग, इलेक्ट्रिकल) अधिक यशस्वी ठरले. कारण एक कॉल चुकल्यास हजारो डॉलर्सचे नुकसान होऊ शकते. 'अप्होका'ने आतापर्यंत १२५ दशलक्ष डॉलर्स (सुमारे १,००० कोटी रुपये) गुंतवणूक उभारली आहे. सध्या कंपनीचे मूल्यांकन एक अब्ज डॉलर्स (८,३०० कोटी रुपये) इतके आहे. एका साध्या मिस झालेल्या कॉलने बदललेल्या नशीबाची ही प्रेरणादायी कहाणी आज अनेक युवकांसाठी प्रेरणा ठरत आहे.

## एआय वर्ल्ड

### 'चॅटजीपीटी' करणार ऑफिसची कामे

संपूर्ण जगात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा (एआय) वापर झपाट्याने वाढत आहे आणि भारतही यात मागे नाही. भारतातील यूजर्समध्ये 'एआय टूल्स'ची प्रचंड क्रेझ पाहायला मिळत आहे. यातच आता जगातील आघाडीची 'एआय' कंपनी 'ओपन एआय' ने आपल्या लोकप्रिय चॅटबॉट 'चॅटजीपीटी' मध्ये एक अत्यंत शक्तिशाली आणि नवीन फीचर आणले आहे. 'चॅटजीपीटी वर्क' असे या नवीन फीचरचे नाव असून, याच्या मदतीने आता यूजर्सना त्यांच्या ऑफिसची आणि दैनंदिन कामे करता येणार आहेत.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, 'ओपन एआय' गेल्या काही काळापासून अशा एका 'डेस्कटॉप प'वर काम करत होते, जिथे यूजर्सना कोडिंगपासून ते रायटिंगपर्यंत सर्व फीचर्स एकाच ठिकाणी मिळतील. याच प्रयत्नातून आता कंपनीने 'चॅटजीपीटी वर्क' सादर केले आहे. या नवीन फीचरमध्ये यूजर्सना 'चॅटजीपीटी', कोडेक्स (कोडिंग असिस्टंट) आणि नवीन 'वर्क एजंट' एकाच इंटरफेसमध्ये पाहायला मिळतील.


यामुळे युजर्सना वेगवेगळ्या कामांसाठी वारंवार ॲप्स किंवा टूल्स बदलण्याची अजिबात गरज भासणार नाही.

'चॅटजीपीटी वर्क' हे टूल कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामांचा ताण कमालीचा कमी करणार आहे. हे टूल तुमच्या संपूर्ण आठवड्याचे 'स्लॅक' (ऑफिस कम्युनिकेशन ॲप) मेसेज स्कॅन करून त्याची एका मिनिटात सविस्तर समरी (सारांश) तयार करू शकते. विशेष म्हणजे, या टूलवर यूजरचे पूर्ण नियंत्रण असेल. 'एआय' कोणत्या माहितीचा वापर करेल, कधी परवानगी मागेल आणि कधी ॲक्शन घेईल, हे सर्वस्वी यूजरच्या हातात असेल. त्यामुळे डेटा सुरक्षेची काळजी उरणार नाही.

'ओपन एआय' ने 'चॅटजीपीटी वर्क' चे रोलआउट सुरू केले आहे. देशातील सर्व यूजर्सपर्यंत हे अपडेट टप्प्याटप्प्याने पोहोचत आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, 'चॅटजीपीटी' चे 'फ्री अकाउंट' वापरणाऱ्यांनाही हे अपडेट मिळणार आहे. 'मॅक' आणि 'विंडोज' साठी उपलब्ध असलेल्या 'चॅटजीपीटी डेस्कटॉप ॲप' द्वारे यूजर्स या नवीन टूलचा सहज वापर करू शकतील.

# कौशल्यं डिझायनर्सची

वेगळ्या वाटा




डिझायनगच्या क्षेत्रात कल्पकतेला फार महत्त्व आहे. तुम्ही फॅशन डिझायनर असा किंवा इंटिरिअर डिझायनर किंवा मग ग्राफिक, प्रोडक्ट डिझायनर.. डिझायनग म्हटलं की त्यात वैविध्य असायला हवं. डिझायनगच्या क्षेत्रात करिअर करताना कोणती कौशल्यं असायला हवीत याविषयी...

* कल्पकता हा डिझायनगचा गाभा आहे. कल्पकतेच्या बळावरच तुम्ही तुमचे विचार प्रभावीपणे सादर मांडू शकता.
* डिझायनर्सनी सतत निरिक्षण करत रहायला हवं. एखादी छोटीशी गोष्टही त्यांना नवी कल्पना देऊ शकते. आसपासचं वातावरण, निसर्ग, पशूपक्षी यांच्याकडून त्यांना बरंच काही शिकता येईल. सतत प्रयोगशील असणंही गरजेचं आहे. नित्यनवं काहीतरी घडवण्यासाठी नव्या गोष्टी आत्मसात करायला हव्यात.
* कोणताही डिझायनर प्रत्यक्ष कवा अप्रत्यक्षपणे ग्राहकांच्या गरजा भागवत असतो. ग्राहकांच्या आवडींनुसार उत्पादनं तयार करतो. त्यामुळे ग्राहकांच्या गरजा ओळखण्याची क्षमता त्यांच्याच असायला हवी.
* या क्षेत्रातल्या तज्ज्ञांना सतत अपडेट रहायला हवं. लोकांना सतत काहीतरी नवं हवं असतं. ट्रेंड्स, फॅशन सतत बदलत असते. त्यामुळे डिझायनर्सनी सतत अपडेट असायला हवं.

# शाळा देणार लैंगिक शिक्षण

सेक्स एज्युकेशन

देशभरातील शाळांच्या अभ्यासक्रमात सर्वसमावेशक लैंगिक शिक्षणाचा समावेश करण्यासाठी एक मोठा उपक्रम सुरू असल्याचे दिसते. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान, केंद्र सरकारने सांगितले, की २६ सदस्यीय तज्ज्ञ समितीने या विषयावर आपला अहवाल सादर केला आहे. आता, न्यायालयाची मंजुरी मिळाल्यानंतर अंमलबजावणीची प्रक्रिया पुढे जाऊ शकते. या उपक्रमाचा उद्देश किशोरवयीन मुला-मुलींना अचूक माहिती देणे, त्यांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करणे आणि पॉक्सो कायद्याचा संभाव्य गैरवापर कमी करणे हा आहे.




हे प्रकरण किशोरवयीन मुला-मुलींच्या गोपनीयतेच्या हक्काशी संबंधित आहे, ज्याची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली होती. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि आर. महादेवन यांचे खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी करत आहे. शाळांमध्ये लैंगिक शिक्षणासाठी काय तयारी केली आहे, असेही न्यायालयाने केंद्र सरकारला विचारले. यावर उत्तर देताना सरकारने सांगितले, की तज्ज्ञ समितीने आपला अहवाल सादर केला असून अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी केली जाईल.

सुनावणीदरम्यान, न्यायालयाने विशेषतः १५ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलामुलींमधील परस्पर संमतीने होणाऱ्या संबंधांबद्दल चिंता व्यक्त केली. अशा प्रकरणांना गंभीर फौजदारी गुन्हे म्हणून वर्गीकृत करणे सर्व परिस्थितीत योग्य ठरणार नाही, असे न्यायालयाचे मत आहे. म्हणूनच किशोरवयीन मुलामुलींच्या हक्कांचे संरक्षण करण्यावर आणि कायदेशीर जागरूकता वाढवण्यावर भर दिला जात आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, केंद्र सरकारने महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली २६ सदस्यीय राष्ट्रीय तज्ज्ञ समितीची स्थापना केली. या समितीत 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस'मधील तज्ज्ञ, क्लिनिकल मानसशास्त्रज्ञ आणि विविध मंत्रालयांचे प्रतिनिधी यांचा समावेश होता. किशोरवयीन मुलांना त्यांचे हक्क, लैंगिक सुरक्षा आणि 'पॉक्सो' कायद्याबद्दल अधिक चांगल्या प्रकारे शिक्षित करण्यासाठी एक व्यावहारिक आराखडा तयार करण्याचे काम या समितीला सोपवण्यात आले होते. अहवालात म्हटले आहे, की प्राथमिक शाळेच्या स्तरापासूनच या विषयांसाठी तज्ज्ञ शिक्षकाची नियुक्ती करावी आणि आठवड्यातून दोनदा २० मिनिटांचे वर्ग अनिवार्य करावेत.



# लाभ मार्शल आर्टचे

फिटनेस फंडा

जिम, एरोबिक्सपेक्षा वेगळ्या व्यायामप्रकाराकडे वळण्याच्या विचारात असाल तर मार्शल आर्टस ट्राय करायला हरकत नाही. कराटे, ज्युदो, तायक्वांदो हे मार्शल आर्टसचे काही प्रकार आहेत. मार्शल आर्टस शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने खूप लाभदायी आहे. याचे फायदे जाणून घेतल्यावर तुम्ही नक्कीच मार्शल आर्टसकडे वळाल.

* मार्शल आर्टसमध्ये शरीराची हालचाल खूप वेगात करावी लागते. यामुळे हृदयगती वाढते आणि हृदयाला बळकटी मिळते. हृदयाचं आरोग्य सुधारण्यासाठी मार्शल आर्टस अगदी योग्य आहे.
* मार्शल आर्टसमधल्या विविध व्यायामप्रकारांमुळे शरीराची लवचिकता वाढते. शरीर लवचिक झालं की दुखापतींची शक्यताही कमी होते.
* मार्शल आर्टस केल्याने तासाभरात साधारण ५०० कॅलरी खर्च होतात. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी मार्शल आर्टसचा खूप उपयोग होतो.

## जाणून घ्या

### ई-बाइकमध्ये आग का लागते?



इलेक्ट्रिक वाहनांमध्ये मुख्यतः लिथियम आयर्न बॅटरी वापरली जाते. बॅटरीचे तापमान अचानक वाढल्यास 'थर्मल रनअवे' नावाची प्रक्रिया सुरू होते. यात बॅटरी स्वतःच उष्णता निर्माण करू लागते आणि आग किंवा ब्लास्ट होऊ शकतो. सामान्य चुकांमुळेही हा धोका वाढतो. खराब किंवा लोकल चार्जर वापरणे, बाइक रात्रभर चार्जिंगवर सोडणे, अपघातानंतर बॅटरी तपास न करणे आणि गरम बॅटरी लगेच चार्ज करणे या सर्व गोष्टी आगीचे प्रमुख कारण ठरू शकतात.

**आग न लागण्यासाठी टिप्स**

* नेहमी कंपनीने दिलेला ओरिजिनल चार्जरच वापरा.
* बाइक चालवून आल्यानंतर ३० ते ४५ मिनिटे थांबा, मग चार्जिंगला लावा.
* रात्रभर किंवा १००% चार्ज झाल्यावरही चार्जर जोडून ठेवू नका.
* गाडी उन्हात किंवा गरम जागी चार्ज करू नका.
* अपघात झाल्यास बॅटरी अवश्य तपासून घ्या.

इलेक्ट्रिक वाहने खरोखरच पर्यावरणस्नेही आणि खर्च बचत करणारी आहेत; पण त्यांचा वापर करताना थोडी काळजी घेतली तर अशा दुर्घटना टाळता येतील. प्रत्येक ई-बाइक आणि स्कूटी मालकाने ही घटना गांभीर्याने घ्यावी आणि चार्जिंग करताना जागरूक राहावे. आपल्या आणि इतरांच्या जीविताची काळजी घ्या.

# पुरुषांनाही सौंदर्योपचारांचा मोह

लाइफस्टाइल

उपजत सौंदर्यात अधिक भर घालण्यासाठी वैद्यकशास्त्रात सौंदर्योपचार शाखा उदयास आली. ही शाखा म्हणजे केवळ स्त्रियांचा प्रांत समजला जात होता. मात्र, अलीकडच्या काळात पुरुषांमध्येही सुंदर दिसण्याबाबत जागरूकता आणि इच्छा वाढताना दिसत आहे. 'सौंदर्य हेच स्त्रीचे सामर्थ्य, तर सामर्थ्य हेच पुरुषांचे सौंदर्य,' असे म्हटले जाते; मात्र बदललेल्या जगात पुरुषांनाही आता आणखी सुंदर दिसावे, असे वाटू लागले आहे. काही सौंदर्योपचारासाठी शस्त्रक्रिया, तर शस्त्रक्रियाविरहित प्रक्रिया केल्या जातात. पुरुषांमध्ये नाक सरळ करणे, वयोमान कमी दिसावे, पापण्यांचे सौंदर्य वाढावे सैल त्वचा किंवा थकलेला चेहरा तजेलदार दिसावा, यासाठी 'ब्लेफरोप्लास्टी' सारख्या प्रक्रियांकडे कल वाढत आहे.



याशिवाय अपघात, शस्त्रक्रिया किंवा जखमेमुळे शरीरावर राहणाऱ्या व्रणांमुळे आत्मविश्वास कमी होतो. त्यामुळे 'स्कार रिव्हिजन सर्जरी', 'लेझर थेरपी' यासारख्या व्रण सुधारणा प्रक्रिया करता येतात. त्याचबरोबर लठ्ठपणा, हार्मोन्सचा असमतोल, यामुळे पुरुषांच्या स्तनाचा आकार वाढतो. याला 'गाइनोकोमॅस्टिया' असे म्हणतात. यात स्तनाचा आकार कमी करण्यासाठी शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत. पूर्वी संकोचामुळे किंवा माहिती नसल्याने हे उपचार टाळले जायचे; मात्र सुधारलेले वैद्यकीय परिणाम, शिवाय आत्मविश्वासातही भर पडत असल्याने या शस्त्रक्रिया वाढत आहेत. नाकाचे सौंदर्य वाढवण्यासाठी 'राइनोप्लास्टी' आणखी एक लोकप्रिय प्रक्रिया ठरत आहे.

# चीनने निर्मिला मेंदूसारखा संगणक!

भन्नाट टेक्नॉलॉजी

चीनने तंत्रज्ञानाच्या जगात आणखी एक मोठे पाऊल उचलले आहे. झेजियांग विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी मानवी मेंदूप्रमाणे काम करणारा संगणक तयार केला आहे. या अनोख्या संगणकाला 'डार्विन माकड' असे नाव देण्यात आले आहे. त्याची रचना आणि कार्यप्रणाली मानवी मेंदूसारखी आहे. त्यात २० अब्जाहून अधिक कृत्रिम न्यूरॉन्स वापरले गेले आहेत.



**डार्विन माकड म्हणजे काय?**

डार्विन माकड हा एक न्यूरोमॉर्फिक संगणक आहे. तो झेजियांग विद्यापीठाच्या विकासकांनी विकसित केला आहे. त्याचा उद्देश मानवी मेंदूप्रमाणे विचार करणारा, समजून घेणारा, निर्णय घेणारा संगणक तयार करणे हा होता. हा संगणक ९६० 'डार्विन-३' चिप्सवर आधारित आहे. त्यात शंभर अब्जाहून अधिक सायनॅप्स तयार होतात. सायनॅप्स हे असे भाग आहेत, जे न्यूरॉन्सना जोडतात, त्यामुळे ही प्रणाली माहितीवर खूप वेगाने प्रक्रिया करू शकते.

**डार्विन माकडाची प्रमुख वैशिष्ट्ये**

डार्विन माकड फक्त दोन हजार वॅटच्या विजेवर काम करते. त्यामुळे ते ऊर्जेच्या बाबतीत किफायतशीर बनते. हा संगणक तर्क आणि गणिताच्या जटिल समस्या सोडवू शकतो.

# अनुभवा 'रोपवे'चा थ्रिल

भटकंती

प्रत्येक प्रवासप्रेमी ट्रिप अविस्मरणीय करण्यासाठी नेहमीच नवीन ठिकाणे आणि अनोख्या अनुभवांच्या शोधात असतो. त्यातच तुम्हाला निसर्गाच्या जवळ जायचं आहे, तेही हटके अंदाजात तर तुमच्या ट्रिप प्लॅनमध्ये रोपवेच्या सफरींचा समावेश करा. त्यात तुम्हाला निसर्गसौंदर्याचा अनोखा संगम अनुभवायला मिळतो. आसपासचा सुंदर निसर्ग, सूर्यास्त, उंच डोंगर 'रोपवे'मधून पाहायला मिळतात, म्हणूनच देशभरातील अनेक पर्यटन स्थळांवर 'रोपवे' पर्यटकांमध्ये इतके लोकप्रिय आहेत. भारतातील या पाच प्रसिद्ध रोपवेचा आनंद नक्की घ्या.



**गुलमर्ग गोंडोला (जम्मू-काश्मीर)**

गुलमर्ग गोंडोला हा जगातील सर्वात उंच आणि लोकप्रिय 'रोपवे'पैकी एक मानला जातो. जम्मू-काश्मीरमधील गुलमर्ग येथे असलेल्या या 'रोपवे'मधून पर्यटकांना अफारवत शिखर आणि आजूबाजूच्या हिमालयीन दऱ्यांची मनमोहक दृश्ये पाहता येतात.

**औली 'रोप वे' (औली, उत्तराखंड)**

उत्तराखंडमधील जोशीमठ आणि औली यांना जोडणारा हा 'रोपवे' देशातील सर्वात लांब रोपवेपैकी एक आहे. या प्रवासात नंदा देवीसह अनेक बर्फाच्छादित शिखरांची विहंगम दृश्ये पाहायला मिळतात. हिवाळ्यात बर्फ आणि स्कीइंगचा अनुभव मिळत असल्यामुळे पर्यटकांसाठी हा एक लोकप्रिय पर्याय आहे.

**गन हिल 'रोपवे'(मुस्सोरी, उत्तराखंड)**

गन हिल 'रोपवे' उत्तराखंडमधील प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण असलेल्या मसुरीमध्ये आहे. हा 'रोप वे' पर्यटकांना अवघ्या काही मिनिटांमध्ये गन हिल व्ह्यूपॉइंटवर घेऊन जातो. तिथून मसुरी शहर, दून व्हॅली आणि आजूबाजूच्या टेकड्यांचे नयनरम्य दृश्य दिसते.

**गिरनार 'रोपवे' (जुनागड, गुजरात)**

गुजरातच्या जुनागडमध्ये असलेला 'रोप वे' हा आशियातील सर्वात लांब 'रोप वे'पैकी एक मानला जातो. यामुळे यात्रेकरू आणि पर्यटकांना गिरनार पर्वतावर सहज पोहोचता येते. या प्रवासात पर्वत, जंगल आणि नैसर्गिक सौंदर्याची विहंगम दृश्ये पाहायला मिळतात.

**दार्जिलिंग 'रोपवे' (दार्जिलिंग, पश्चिम बंगाल)**

दार्जिलिंग 'रोपवे'ला रंगीत व्हॅली पॅसेंजर केबल कार म्हणूनही ओळखले जाते. या 'रोपवे'मधून हिरवीगार चहाची लागवड, खोल दऱ्या, घनदाट जंगले पाहायला मिळतात. येथून हिमालयाच्या शिखरांची विहंगम दृश्ये दिसतात. नैसर्गिक सौंदर्य आणि साहसाचा संगम शोधणाऱ्या पर्यटकांसाठी हा एक लोकप्रिय मार्ग आहे.

# साईसूर्य नेत्रसेवेचा वर्धापन दिन अनोख्या दृष्टी सोहळ्याने साजरा

नगर – येथील साई सूर्य नेत्रसेवेचा ४१ वा वर्धापन दिवस उत्साहाने अनोख्या दृष्टी सोहळ्याने साजरा करण्यात आला. कॉन्टॅक्युरा लेसर नेत्रशिबीर तसेच नेत्रदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या कुटुंबियांचा सन्मान करीत हा नेत्रउत्सव संपन्न झाला.

१५ ऑगस्ट १८८५ साली डॉ. प्रकाश व डॉ. सुधा कांकरिया यांनी साई सूर्य नेत्रसेवाची स्थापना केली. आजपर्यंत लाखो नेत्ररूग्णांनी त्याचा लाभ घेतला. अनेक शोध निबंध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिध्द होऊन जागतिक किर्ती प्राप्त झाली. हे सर्व आई वडिलांच्या पुण्याईने व नेत्ररूग्णांनी दिलेल्या आशीर्वादामुळे तसेच नगरकरांनी केलेल्या सहकार्यामुळे शक्य झाले अशी भावना डॉ. सुधा व डॉ. प्रकाश कांकरिया यांनी व्यक्त केली.

सदर सोहळ्याचे उद्घाटन रोटरी क्लब ऑफ अहमदनगरचे अध्यक्ष सुहास क्षीरसागर यांच्या हस्ते झाले. त्यावेळेस रोटरीचे सेक्रेटरी संदिप ठोंबे, निलेश वैकर, रविंद्र राऊत, ब्रह्माकुमारीच्या बी के ज्ञानेश्री हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नेत्रदान केलेल्या कुटुंबियांच्या सन्मान सोहळ्यास नेत्रतज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब बोरूडे, सचिव डॉ. राजीव चिटगोपीकर, रोटरीचे माजी प्रांतपाल शिरीष रायते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



नेत्रदान केलेल्या कुटुंबांचा सन्मान करताना डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया, संदिप ठोंबे, निलेश वैकर, रविंद्र राऊत आदी.

कार्यक्रमात परतूर (जि. जालना) येथील लुई ब्रेल शिक्षण संस्थेचे दृष्टी गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

सुरूवातीस डॉ. सुधा कांकरिया यांनी स्वागत केले. एका व्यक्तीने केलेले नेत्रदान दोन अंध व्यक्तींना दृष्टी प्रदान करीत असते. तरी नेत्रदानाच्या या पवित्र कार्यात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करून त्यांनी सर्व उपस्थितांना मरणोत्तर नेत्रदानाची शपथ दिली. डॉ. प्रकाश कांकरिया यांनी साई सूर्य नेत्रसेवा व मानकन्हैय्या नेत्रपेढीच्या कार्याचा आढावा घेतला. स्वत:च्या पिताश्रींचे नेत्रदान स्वत:च करून नेत्ररोपणही यशस्वी केले. याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. २५ वर्षांपूर्वी यशस्वी नेत्ररोपण केलेले घोडेचोर हे ही यावेळेस उपस्थित होते. त्यांनी डॉक्टरांचे आभार मानले आणि नेत्रदानाच्या चळवळीत सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

यावेळी डॉ. बोरूडे म्हणाले, डॉ. कांकरिया परिवाराच्या नेत्रदिपक कार्यामुळे आज नगरची ओळख देशात आहे. त्यांनी अत्याधुनिक नेत्रसेवा नगर सारख्या छोट्या शहरात आणून एक इतिहास घडविला आहे. रोटरीचे शिरीष रायते यांनी साई सूर्य नेत्रसेवेच्या कार्याबद्दल गौरव केला तर डॉ. राजीव चिटगोपीकर यांनी हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या. सुहास क्षीरसागर यांनी नेत्रशिबीरामुळे अनेक नेत्ररूग्णांना दिलासा मिळाला हे नमुद केले.

जेव्हा चारूशीलाच्या आईंचा मृत्यू झाला, तेंव्हा त्यांची लेक ही एकटीच घरी होती. तिने आपले दु:ख बाजूला ठेऊन, न घाबरता नेत्रपेढीला फोन केला व आईचे नेत्रदान करून घेतले. अशी धाडसी व दु:खातही समाजकल्याणाची भावना जोपासणाऱ्या चारूशीला जोशीचे स्त्री जन्माचे स्वागत करा हे पुस्तक देऊन विशेष सन्मान करण्यात आला. अशा लेकी या केवळ समाजाचाच नाही तर देशाचा आधारस्तंभ असतात. म्हणूनच स्त्री जन्माचे स्वागत करा, असे आवाहन डॉ. सुधा कांकरिया यांनी केले. सुत्रसंचलन व्यवस्थापक रामदास केदार यांनी केले. शेवटी डॉ. प्रकाश कांकरिया यांनी आभार मानले.



## गुरुवाणी – ३०

### स्वतः विषयी निगेटिव्ह विचार नको

राग आला की हाताच्या मुठी आवळू नका, त्या ढिल्या सोडा. यामुळे राग नियंत्रणात येईल. मनात अहंकार येत असेल तर सकाळी उठताच स्वत:च्या पाया पडा. परिणामी जास्तीत जास्त खाली वाकता. त्यामुळे अहंकार गळून पडेल. कानाने सगळ्यात जास्त आश्रव होतो. तुम्ही तोंड, डोळे बंद करू शकता पण ऐकणे कायम चालू असते. तुम्हाला प्रवचनाचे शुभ आश्रव झाले पाहिजे. तुम्ही कोणत्याही कामासाठी बाहेर जाताना मनात निगेटिव्ह विचार जास्त करता. माझे काम होईल की नाही? मला हवं ते मिळेल की नाही? स्वतः विषयी, स्वत:च्या भविष्याविषयी निगेटिव्ह विचार कशाला करता ? अनपेक्षित होणे म्हणजे वाईटच होते असे काही नाही. ज्यावेळी आपला हात आपल्या डोक्यावर जातो तेव्हा आपली अक्कल जागेवर येते. तुमचा समवशरणमध्ये आश्रव होतो, बंध नाही. अनेकदा आश्रव पुण्याचा होतो पण बंध पापाचा होतो. कधी आश्रव पापाचा होतो तर बंध पुण्याचे होते. ऋद्धिसाल राजा आपल्या राणीवर वेड्यासारखे प्रेम करायचा. तो रोज मन लावून राणीची केशरचनाही करायचा. संपूर्ण राज्यात याची चर्चा होती. एक दिवस राजा राणीची केशरचना करत असताना इतका तल्लीन झाला की, त्याला केवल ज्ञान प्राप्त झाले. बाहेर भोग चालू होता पण आतमध्ये योग चालू होता. बाहुबलीने दीक्षा घेतली पण मनात अहंकार आला. माझ्या लहान भावंडांनी आधी दीक्षा घेतलीय, मला त्यांना वंदन करावे लागेल. मी आधी केवल ज्ञान प्राप्त करतो. त्याने कठोर साधना सुरु केली. पण कठोर साधना करूनही त्याला केवल ज्ञान प्राप्त होईना. त्याची बहिण ब्राम्हीकुमारीने प्रभूला विचारले, बाहुबली इतकी साधना करत असूनही त्याला फळ का मिळत नाही? प्रभू त्याच्या बहिणीला सांगतात की, तो अहंकारात अडकला आहे. बहिणीने बाहुबलीला त्याच्या अहंकाराची जाणीव करून दिली. त्याचे डोळे उघडले. त्याने आपल्या बंधूंना नमन करण्यासाठी पाऊल उचलले आणि त्याला केवल ज्ञान झाले. ही असते बहिण भावाच्या नात्याची ताकद. जिचे शब्द कानावर पडताच आतले सगळे दुर्भाग्य संपतात, तिला 'बहिण' म्हणतात.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

# अल करम हॉस्पिटलच्या रक्तदान शिबिरात ५५ जणांनी केले रक्तदान

नगर – स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून रामचंद्रखुंट येथील अल करम हॉस्पिटलच्या वतीने हॉस्पिटल परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिक व रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी तब्बल ५५ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

याप्रसंगी डॉ.जहीर मुजावर, डॉ. अशपाक पटेल, डॉ. अशोक भंडारे यांनी रक्तदात्यांना रक्तदानाचे महत्त्व, त्याचे फायदे तसेच रक्तदानाबाबत आवश्यक माहिती दिली. रक्तसंकलनाचे कार्य साईसेवा ब्लड बँकेच्या अजित जगताप, पायल वैद्य, दीपक कुंभार, क्रिश सुरपम व प्रतीक्षा गरमडे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एजाज तांबोली यांनी केले.

प्रास्ताविक तौफिक तांबोली यांनी केले, रक्तदात्यांचे स्वागत राजीक खान,समीर सय्यद यांनी केले. तर आभार अरशद सय्यद यांनी मानले.

# प्रियदर्शनी स्कूलच्या विद्यार्थिनीची सुवर्ण कामगिरी



नगर – २१ ते २३ ऑगस्ट रोजी राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मैदानावर १७ वर्षाखालील महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशन आयोजित राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धा पार पाडल्या. या स्पर्धेत भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूलची खेळाडू विद्यार्थिनी श्लोका अर्चना संदीप खर्से हिने अहिल्यानगर जिल्हा संघाकडून खेळताना उत्कृष्ट कामगिरी करत अहिल्यानगर जिल्हा मुलींच्या संघाला सुवर्णपदक प्राप्त करून दिले.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. श्लोका अर्चना संदीप खर्से हिने आपल्या संघाकडून खेळताना उत्कृष्ट फलंदाजी व क्षेत्रक्षण करत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. अंतिम सामन्यात तिने चमकदार कामगिरी करत संघाला सुवर्णपदक मिळवून देण्याचे महत्त्वाचे भूमिका बजावली.

श्लोकाच्या उल्लेखनीय यशाबद्दल प्रियदर्शनी पब्लिक स्कूल भिंगार शाळेचे संस्थापक बाळासाहेब खोमणे, प्राचार्या अंजली बोधक, उपप्राचार्य अमोल घोरपडे, तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद, पालक यांनी तिचे अभिनंदन केले.

तिला क्रीडा मार्गदर्शक घनश्याम सानप, प्रवीण शिर्के, तसेच आशिष भिंगारदिवे यांचे मार्गदर्शन लाभले.

# अप्पर पोलीस आयुक्त संजय जाधव यांना राष्ट्रपती पदक

नगर – नांदगाव शिंगवे येथील रहिवाशी व ठाणे अप्पर पोलीस आयुक्त संजय जाधव यांना उल्लेखनीय व गुणवत्ता पूर्वक सेवेबद्दल राष्ट्रपती पदक बहाल करण्यात आले. श्री जाधव यांनी महाराष्ट्र पोलीस दलामध्ये दिलेल्या दीर्घकालीन व निष्कलंक उत्कृष्ट सेवेची दखल घेउन त्यांची राष्ट्रपती पदकासाठी निवड करण्यात आली.



त्यांनी नांदेड, पुणे, मुंबई, कल्याण येथे पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस आयुक्त म्हणून नांव लौकिक मिळविला आहे. जुलै २०२४ मध्ये त्यांनी ठाणे येथील पदभार स्वीकारला आणि २०२५ मध्ये त्यांची पदोन्नती होउन सध्या अपर पोलीस आयुक्त ठाणे येथे कार्यरत आहेत. याआधी त्यांना विविध पुरस्कार मिळालेली आहेत.

# ब्ल्यू डायमंड अकॅडमीमध्ये निवडणूक प्रक्रियेद्वारे स्कूल मिनिस्टरची नियुक्ती

नगर – वडगाव गुप्ता येथील ब्ल्यू डायमंड अकॅडमीमध्ये स्कूल मिनिस्टर निवडीसाठी निवडणुकीचे आयोजन करण्यात आले. स्कूल–मधील सर्व विद्यार्थी, शिक्षकांच्या मतदानानंतर इयत्ता १० तील पीयूष पाडेकर याची स्कूल मिनिस्टरपदी नियुक्ती करण्यात आली.

या निवडणुकीत इयत्ता ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांमधून उमेदवार निश्चित करण्यात आले होते. ६वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी आधारकार्डद्वारे प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेचा अनुभव घेतला व मतदान केले. विद्यार्थ्यांना उमेदवारी मिळणे, प्रचार करणे, इतरांना मतदानासाठी प्रोत्साहन देणे व प्रत्यक्ष मतदान करणे या सर्व गोष्टींचा अनुभव घेता आला. मतदान प्रक्रियेबाबत असलेली विद्यार्थ्यांची उत्सुकता व प्रत्यक्ष मतदान केल्यानंतर त्यांचा आनंद चेहऱ्यावर झळकत होता. विद्यार्थी व शिक्षकांच्या मतदानानंतर इ. १० तील पीयूष पाडेकर याची स्कूल मिनिस्टरपदी नियुक्ती करण्यात आली. तर इ. ९वीतील सत्यम शेळके याची हेडबॉय व बुशरा शेख हिची हेड गर्ल म्हणून निवड झाली. इयत्ता नववीतील फजल शेख व तनिष्का काळे यांची स्पोर्ट्स कॅप्टन म्हणून नियुक्ती करण्यात आली. नियुक्त झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा शपथविधी पार पडला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे प्राचार्य सुजित डोंगरे व उपप्राचार्य शारदा शेळके यांनी अभिनंदन व कौतुक केले.




ब्ल्यू डायमंड अकॅडमीमध्ये निवडणुकीतून निवडलेले विद्यार्थी प्रतिनिधी.

नोंदणी क्र. : ए.एन.आर./ए.एन./आर.एस.आर./सी.आर. ३२३. दि. १८/०७/१९९१

## कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अ.नगर

श्रीरंग अपार्टमेंट, स्वामी विवेकानंद चौक, शनि मंदिरा समोर, गुजरगल्ली,अ.नगर.

### वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

आपल्या संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या **संस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ६ सप्टेंबर २०२६ या दिवशी ठीक दु. १२.०० वाजता आयोजित केलेली आहे.** तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून खालील विषयांचा विचार विनिमय करावा, ही नम्र विनंती.

सभेचे अध्यक्ष – **मा.श्री. रखमाजी भाऊसाहेब निस्ताने** (चेअरमन)

सभेचे ठिकाण – **गायत्री मंगल कार्यालय,** महाजनगल्ली, अहिल्यानगर.

✻ सभेपुढील विषय ✻

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १४/०९/२०२५ चा वृतांत वाचुन कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाने तयार करून सादर केलेला दि. ३१/३/२०२६ अखेरच्या वर्षाचा अहवाल ताळेबंद आणि नफातोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२५–२०२६ चे नफा वाटणीस मंजूरी देणे.
४) मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या २०२६–२०२७ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
५) सन २०२५–२०२६ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.
६) सन २०२५–२०२६ चे लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
७) सन २०२६–२०२७ करीता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणुक केली त्यास मंजुरी देणे.
८) महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ७५ (२) अन्वये मा. कार्यकारी मंडळाचे सदस्यांकडील येणे कर्ज आणि थकबाकीची माहिती देणे.
९) वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असणाऱ्या सभासदांची गैरहजेरी मंजुर करणे.
१०) पतसंस्थांचे आदर्श पोटनियम २०२५ यास मंजूरी देणे.
११) मा. अध्यक्ष साहेब यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

व्यवस्थापक
कैलास नागरी सह. पतसंस्था मर्या.
दिनांक : २४/०८/२०२६ (संचालक मंडळाच्या आदेशा नुसार)

विशेष सुचना – १) सभेस आवश्यक ती गणपूर्ती न झाल्यास अर्धातास सभा तहकूब ठेवण्यात येईल व त्यानंतर उपस्थितांचे हजेरीत त्याच ठिकाणी सभा घेतली जाईल त्या वेळेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.
२) वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेचे कामकाजाविषयी कोणत्याही सभासदांस प्रश्न विचारावयाचे असतील तर त्या बाबत प्रश्न/सुचना दिनांक १ सप्टेंबर २०२६ पूर्वी कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाठवावीत.

Asha

# रेणावीकर विद्यामंदिर शाळेने पटकावला देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेत प्रथम क्रमांक

नगर – अहिल्यानगर एमआयडीसीतील क्लासिक व्हील प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आणि रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी आयोजित आंतरशालेय देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेत म. ए. सोसायटीच्या रेणावीकर विद्यामंदिर शाळेने प्रथम क्रमांक पटकावला.

आओ बच्चो तुम्हे दिखाये हे गाणे विद्यार्थ्यांनी सादर केले. अतिशय तालासुरात व तल्लीन होऊन विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. त्यामुळे शाळेला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. आपल्या सादरीकरणाने विद्यार्थ्यांनी परीक्षकांबरोबरच प्रेक्षकांची देखील मने जिंकली. संपूर्ण प्रेक्षागृह विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने भारावून गेले. देशप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या एक से बढकर एक गीतांनी संपूर्ण स्पर्धेचा माहोल अतिशय संगीतमय झाला होता.

विद्यार्थ्यांना शाळेचे संगीत शिक्षक कल्पेश अदवंत यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा गायकवाड यांनी सर्वांचे विशेष कौतुक केले. शाळेतर्फे सततच अशा कलाविषयक उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाते. स्वातंत्र्यदिनानिमित्त क्लासिक व्हील प्रायव्हेट लिमिटेड आणि रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी यांच्यातर्फे दरवर्षी या स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील नगरमधील अनेक शाळांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. चुरशीच्या झालेल्या स्पर्धेत शाळेने प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली शेत मिळकत ही विद्यमान मालक **उषा रमेश अनभुले रा. ४१, मिस्कीन कॉलनी, मिस्कीन नगर, सावेडी, अहिल्यानगर** यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाशी व्यवहाराची बोलणी केली असून, विसार म्हणून रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदीखत करून देण्याचे ठरवले आहे. सदर मिळकतीबाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात **(७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :–**

डि।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगरपैकी ग्रामपंचायत हद्दीतील तसेच मा, दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे वाळुंज, ता. नगर येथील शेत जमिनीचा गट न. ३३२ याचे क्षेत्र ६ हे. ९१ आर + पोट खराबा क्षेत्र 0 हे. 0१ आर, असे एकूण क्षेत्र ६ हे. ९२ आर. याचा आकार १९ रु. ९४ पै. यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचे क्षेत्र 0 हे. ५३.८३ आर. हे संपूर्ण क्षेत्र,

**यांसी चतु:सिमा खालीलप्रपाणे :–**

पुर्व :– गट नं. ३३२ पैकी उर्वरित क्षेत्र
दक्षिण :– गट नं. ३३२ पैकी उर्वरित क्षेत्र
पश्चिम :– गट नं. ३६,
उत्तर वाळूंज – अरणगाव रस्ता (बाह्यवळण रस्ता),

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर
दि.२५/०८/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली मिळकत ही विद्यमान मालक **श्री स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेंव्हलपर्सचे प्रोप्रा. गणेश विठ्ठल उपरे,** रा. शुक्लेशवर कॉलनी, भिंगार, अहिल्यानगर यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरला असून, सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद मिळकतबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करून द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन : –

डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे सावेडी येथील सर्व्हे नं. ३१२/१ मधील प्लॉट नं. २४ याचे क्षेत्र १९८.00 चौ. मी. ही संपूर्ण प्लॉट मिळकत.

यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे.

पुर्वेस :– प्लॉट नंबर २५ दक्षिणेस :– सर्व्हे नं. ३१२/२
पश्चिमेस :– प्लॉट नं. २३ उत्तरेस :– ६ मी. रुंदीचा रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुद्धा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

अहिल्यानगर, दिनांक :– २५/०८/२०२६.

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

# 'दिल से सरहद तक' नगर येथील बहिणींच्या प्रेमाचा धागा थेट सीमेवर

नगर – रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या वीर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अहिल्यानगरमध्ये भावनिक आणि देशभक्तीपर उपक्रम राबविण्यात येत आहे. लायन्स क्लब, लिओ क्लब आणि घर घर लंगर सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच भारतीय डाक विभागाच्या सहकार्याने 'दिल से सरहद तक' हा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत अहिल्यानगरमधील बहिणींनी प्रेमाने दिलेल्या राख्या भारतीय डाक विभागाच्या माध्यमातून देशाच्या सीमेवर तैनात असलेल्या वीर जवानांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. कुटुंबापासून हजारो किलोमीटर दूर राहून, प्रतिकूल हवामान आणि अत्यंत कठीण परिस्थितीत देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांना रक्षाबंधनाच्या दिवशी आपल्या बहिणींच्या प्रेमाची जाणीव व्हावी, या भावनेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

अहिल्यानगरमधील सर्व महिला भगिनी, लायन्स क्लब व लिओ क्लबच्या महिला सदस्य, महिला मंडळे तसेच नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. प्रत्येक महिलेने स्वतः एक राखी देतानाच आपल्या मैत्रिणी, नातेवाईक, परिचित महिला आणि महिला मंडळांनाही या उपक्रमात सहभागी करून घ्यावे, असे आवाहन लायन्स क्लबचे अध्यक्ष हरजीतसिंग वाधवा, लिओ क्लबचे अध्यक्ष हर्ष किथानी, हरीश हरवानी, रीत जाजू, विजय कुलकर्णी, किरण भंडारी आणि गुरनूरसिंग वाधवा यांनी केले आहे.

नागरिकांनी आपल्या राख्या घर घर लंगर सेवा, तारकपूर व जय जलाराम बेकरीजवळ, आनंद धाम, येथे जमा कराव्यात. अधिक माहितीसाठी ९४२३१६२७२७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

या उपक्रमासाठी धनंजय भंडारे, अरविंद परगावकर, अनघा परगावकर, सतीश बजाज, प्रशांत मुनोत, सुनील छाजेड, किशोर रंगलानी, दिलीप कुलकर्णी, राजू गुरनानी, कमलेश भंडारी, संदीप कातरिया, सुमित लोढा आणि डॉ. संजय असनानी प्रयत्नशील आहेत.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली प्लॉट मिळकत विद्यमान मालक वेदश्री कन्स्ट्रक्शनचे प्रोप्रा. श्री. मनोज अभिमन्यु येरकळ, रा. लिंक रोड, माधव बाग नगर, शिवाजीनगर, केडगांव, अहिल्यानगर, श्री. युवराज रामदास कोतकर, रा. कोतकर मळा, एकनाथ नगर, केडगांव, अहिल्यानगर, सौ. अनिता रामदास काकडे, रा. काकडे मळा, केडगांव, अहिल्यानगर, श्रीनिवास कन्स्ट्रक्शनचे प्रोप्रा. श्री. ताराचंद प्रल्हाद डोंगरे, रा. आई एस सी कॉलनी, वडगांव गुप्ता, अहिल्यानगर व श्री. प्रविण विक्रम कोतकर, रा. नगर पुणे रोड, कोतकर मळा, केडगांव अहिल्यानगर यांचे मालकी वहिवाटीचा असून यांनी सदर प्लॉट मिळकतीचे विक्री करण्याचा करार करून आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन सदरची मिळकतीचे खरेदी विक्रीचा करारनामा आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व व्यवहारापोटी विसार म्हणून रक्कम सुध्दा घेतलेली आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकती बाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत,गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र, मनाईहकूम, दावा, कोर्ट कारवाई, बॅंक बोजा, सोसायटी राईटस, अन्न, वस्त्र, लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो.तु.ता.नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे केडगांव येथील स.नं. १८६/१/२/१३ मधील बिगरशेती प्लॉटचे वर्णन खालील प्रमाणे.

| प्लॉट नं. | क्षेत्र चौ. मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ४० | १३६.०० | प्लॉट नं. २५ | प्लॉट नंबर ४१ | ९.०० मी. रस्ता | प्लॉट नं. ३९ |
| ही विद्यमान मालक यांचे मालकीची संपुर्ण प्लॉट मिळकत या बाबत. | | | | | |

दि. २५/०८/२०२६, अहिल्यानगर
विद्यमान मालक

**ॲड. संदीप नामदेव भोगाडे** (एम.ए.एल.एल.बी)
पत्ता: स्टेट बॅंक चौक, अहिल्यानगर, मो–९४२०३३५५३५, ८२०८७३०७००

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ट वर्णन केलेली अहिल्यानगर मिळकत ही विद्यमान मालक **१. आदित्य अच्युत उंडे** रा. नंदनवन नगर, सावेडी, अहिल्यानगर **२.अच्युत विश्वनाथ उंडे** रा. आर्शिवाद निवास, गजानन कॉलनी, वडगांव गुप्ता रोड, अहिल्यानगर **३. सौरभ पोपट भांड** रा. धनगर गल्ली, भिंगार, अहिल्यानगर **४.शारदा पोपट भांड** रा. धनगर गल्ली, भिंगार, अहिल्यानगर **५. तनिष्का रणजितसिंग परदेशी** रा. सौरभनगर, भिंगार, अहिल्यानगर यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विदयमान मालक यांनी विसारापोटी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकतीवर कोणत्याही बॅंकेचे कर्ज नाही. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :– डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी आहिल्यानगर महानगरपालिका अहमदनगर हद्दीतील तसेच मा. दुय्य**म निबंधक साहेब, अ.नगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं. ४६/२/१ पै मधील खालील वर्णनांची प्लॉट मिळकत :–

| प्लॉट नं. | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ चौ. मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| २३ | १८ | १६५.९९ हा संपुर्ण प्लॉट | लागु सर्व्हे नं. ४७/१ पैकी मधील ॲमिनिटी स्पेस व प्लॉट नं. ९ | प्लॉट नंबर २४ | ९.00 मी. रुंदीचा रस्ता | प्लॉट नं. २२ |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक संपुर्ण प्लॉटस् मिळकती व तदंगभुत वस्तू, वहिवाट वागणुकीचे हक्कासह काहीही एक राखून न ठेविता असे

अहिल्यानगर , दि. २५/८/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे, ॲड. ओकार पंडीत मोरे**
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली , मिळकतीचे विद्यमान मालक **१. सिद्दीखे खानजानखानी रा. रोझ ब्लॅक ३०९, गार्डन टावर्स,मसाब टॅंक, हैद्राबाद. २. मिर्झाएमफाझेल माहमुद शौकती रा. २११ एम विंग, कृष्णा इन्क्लेव्ह,अ.नगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन, मालकांनी सदर मिळकत निर्वेध व निजोखमी व बोजारहीत असल्याचे तसेच मार्केटेबल टायटल/पणन योग्य हक्क असल्याची खात्री व भरवसा करुन घेण्याचे असल्याने प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे. तरी सदर मिळकती मध्ये अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीतांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन **(१५ दिवसांचे)** आत परस्पर कोणत्याही वर्तमानपत्रात हरकत न देता (वर्तमानपत्रात हरकत प्रसिध्द केल्यास ग्राह्य धरली जाणार नाही)आमच्या दिलेल्या पत्यावर मुळ आणि/किंवा साक्षांकीत कागदपत्रासह प्रत्यक्ष हजर राहुन आमची खात्री पटवुन दयावी, मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत नं आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे किंवा संबंधीतांनी त्यांचे असलेले हक्क व हितसंबंध अधिकार जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजले जाईल व तदनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :**

डि.।। अहिल्यानगर सब. डि. ।। ता. अहिल्यानगर जिल्हा परिषद हददीतील **मौजे चिचोंडी पाटील** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| ग.नं. | हे. आर. | आकार |
|---|---|---|
| ९१७ | ६.७० | ७.५६ |
| | ख. ०.४५ | |
| | ७.१५ | |

**यापैकी विदयमान मालक यांच्या मालकीची संपुर्ण ० हे. ५१ आर जमिनीबाबत.**

**यासी चतु:सिमा–**

**पुर्वेस :** ग.न. ९१७ पैकी शबाना महेबुब खान, **दक्षिणेस :** गट नं ९१७ पैकी,
**पश्चिमेस :** गट नं ९१७ पैकी, **उत्तरेस :** गट नं ९१७ पैकी रस्ता,
**येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.**

दि.१९/०८/२०२६
अ.नगर.

शिक्का

सही /-
**ॲड. हारीस अ. कंपली**
शॉप नं. ११ प्रेरणा आर्केड तारकपुर बसस्टॅण्ड समोर, ६७/बी तामीर कॉलनी दर्शन नगर मुकुंदनगर
मो.न. : 7972656823.

